cmyk

## संपादकीय

### ‘सत्तेच्या सावलीतले बाबा आणि समाजाची अंधश्रद्धेची कैद’

जगाच्या पातळीवर घडणाऱ्या घटनांमध्ये कधी कधी अशा वळणांचा अनुभव येतो, की एका मोठ्या प्रकरणावरून लक्ष हटवण्यासाठी दुसऱ्या अधिक मोठ्या संघर्षाची निर्मिती केली जाते, अशी शंका निर्माण होते. अमेरिकेतील एपस्टिन प्रकरणाने जगभरातील सत्ताधारी, उद्योगपती आणि प्रभावशाली मंडळींच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उभे केले होते. या प्रकरणातील चर्चांनी अनेकांचे चेहरे उघडे पडले. मात्र अचानक जागतिक पटलावर युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आणि त्या चर्चांचा आवाज हळूहळू विरत गेला.

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३१ | रविवार दि.१९ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### हॉर्मुझची सामुद्रधुनीत दोन व्यापारी जहाजांवर गोळीबार

तेहरानः इराणने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीवर पुन्हा एकदा आपले लष्करी नियंत्रण कडक केल्याची घोषणा केल्यानंतर, शनिवारी ही सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न करणाऱ्या किमान दोन व्यापारी जहाजांवर गोळीबार झाल्याची माहिती समोर आली आहे. तीन सागरी सुरक्षा आणि जहाज वाहतूक स्रोतांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. दरम्यान, या गोळीबार प्रकरणी अमेरिकेकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. इराणचे सर्वोच्च नेते मुजतबा खमेनी यांनी त्यांच्या टेलिग्राम चॅनेलवर एक आव्हानात्मक संदेश पोस्ट करत म्हटले आहे की, ‘‘इराणचे नौदल आपल्या शत्रूंचा पराभव करण्यासाठी सज्ज आहे.‘‘ सागरी ट्रॅकर्सनी दिलेल्या माहितीनुसार, सात आठवड्यांपूर्वी अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासून जहाजांची ही पहिलीच मोठी हालचाल होती. सुरुवातीला आठ टँकरचा ताफा या सामुद्रधुनीतून जाताना दिसला होता. मात्र, अमेरिकेने इराणच्या बंदराची नाकेबंदी सुरूच ठेवल्याने, इराणने जगातील एकूण तेल व्यापाराच्या पाचव्या भागासाठी महत्त्वाच्या असलेल्या या जलमार्गावर पुन्हा कडक लष्करी निर्बंध लादले आहेत.

### गाडी दरीत कोसळली; ५ शिक्षिकांसह ९ जण ठार

कोइम्बतूर : तामिळनाडूतील वालपराई-पोल्लाची घाटात शुक्रवारी रात्री एक भीषण अपघात झाला. पर्यटकांची गाडी खोल दरीत कोसळल्याने केरळमधील ९ पर्यटकांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये मल्लापूरम जिल्ह्यातील एका सरकारी शाळेतील पाच शिक्षिकांचा समावेश आहे. केरळच्या मल्लापूरम जिल्ह्यातील पेरिंथलमन्ना येथून १३ जण वालपराई येथे पर्यटनासाठी गेले होते. शुक्रवारी संध्याकाळी ५:१५ च्या सुमारास परतत असताना, घाटातील १३ व्या तीव्र वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. व्हॅन रस्त्यावरून घसरत दाट जंगलातून खाली कोसळली आणि नवव्या वळणाजवळ जाऊन थांबली. अपघात इतका भीषण होता की नऊ जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

### हापूस आंब्याची आवक वाढली; दरात घसरण

मुंबईः कोकणातील हापूस आंब्याचा मुख्य हंगाम सुरू होताच वाशीच्या घाऊक बाजारात आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. वाढलेल्या आवकेमुळे आंब्याच्या दरात काहीशी घसरण झाली असून, त्यामुळे आंबा खवय्यांना आता हापूसचा आस्वाद घेणे सुलभ होणार आहे. अक्षय्य तृतीयेमुळे बाजारात आंब्याची आवक वाढली आहे. यंदा मात्र बदलत्या हवामानाचा मोठा फटका बसल्याने कोकणातील हापूस आंब्याचे उत्पादन सुमारे ८० टक्क्यांनी घटले आहे. परिणामी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात बाजारात हापूसची आवक अत्यल्प होती. त्यामुळे दर चढे राहिल्याने सर्वसामान्य ग्राहकांना आंबा परवडत नव्हता. एप्रिल-मे हा हापूसचा मुख्य हंगाम मानला जातो. या कालावधीत उत्पादन आणि आवक वाढल्याने दर नियंत्रणात येतात. यंदा मात्र एप्रिलच्या सुरुवातीपर्यंतही आवक कमीच होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१८ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४२.०० क्विंटल | २,००० | २,७०१ | २,२८४ |
| ज्वारी/हायब्रिड: १६४.०० क्विंटल | १,७४० | ४,६०१ | २,६८६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२६.०० क्विंटल | २,२०० | २,६४९ | २,३५४ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ९.५० क्विंटल | ५,२५१ | ५,२५१ | ५,२५१ |

# खरीप हंगाम धोक्यात; विक्रेत्यांचा बेमुदत बंदचा इशारा

## माफदाचा सरकारला अल्टिमेटम, ‘लिंकिंग’ जबरदस्तीवरून संघर्ष; २७ एप्रिलपासून संप

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील खरीप हंगाम अगदी तोंडावर असताना शेतकऱ्यांसाठी चिंताजनक घडामोड समोर आली आहे. रासायनिक खतांमध्ये ‘लिंकिंग’ची सक्ती तसेच प्रतिबंधित एचटीबीटी बियाण्यांच्या वाढत्या पुरवठ्याच्या मुद्द्यावरून महाराष्ट्र फर्टिलायझर, पेस्टीसाईड्स अँड सीड्स डिलर्स असोसिएशन (माफदा) आक्रमक झाली आहे. शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास २७ एप्रिलपासून राज्यभरातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रे बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा देण्यात आला आहे.**



खते, बियाणे आणि कीटकनाशके वेळेत उपलब्ध न झाल्यास खरीप पिकांच्या पेरणीवर थेट परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. आधीच अनियमित पावसाच्या अंदाजामुळे शेतकरी चिंतेत असताना या संभाव्य बंदमुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. ‘माफदा’च्या म्हणण्यानुसार, खत उत्पादक कंपन्या मुख्य खतांसोबत शेतकऱ्यांना नको असलेली इतर उत्पादने जबरदस्तीने घेण्यास भाग पाडत आहेत. या ‘लिंकिंग’ पद्धतीमुळे विक्रेत्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून, त्याचा परिणाम थेट शेतकऱ्यांच्या खिशावर होत आहे. शेतकऱ्यांना आवश्यक नसलेली उत्पादने खरेदी करावी लागत असल्याने त्यांचा खर्च वाढत असल्याची तक्रार आहे. याशिवाय, प्रतिबंधित असतानाही एचटीबीटी बियाण्यांचा पुरवठा वाढत असल्याचा गंभीर आरोप ‘माफदा’ने केला आहे. शेजारील राज्यांतून येणाऱ्या अप्रमाणित व निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे अशा बियाण्यांवर तातडीने नियंत्रण आणण्याची मागणी संघटनेने केली आहे. विक्रेत्यांच्या समस्यांबाबतही ‘माफदा’ने मुद्दा उपस्थित केला आहे. विक्रेते सीलबंद पॅकेटमधील बियाणे खरेदी करून तसेच शेतकऱ्यांना विकतात. मात्र, तपासणीत बियाणे निकृष्ट ठरल्यास केवळ विक्रेत्यांनाच जबाबदार धरले जाते. ही पद्धत अन्यायकारक असल्याचे सांगत विक्रेत्यांना आरोपीऐवजी ‘साक्षीदार’ म्हणून मान्यता द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, शासनाने ▶▶ पान २ वर

# ब्रेकिंग बातमीचे दिवस गेले-राजेंद्र दर्डा

## अ भा मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनाला थाटात सुरुवात

उदगीर । प्रतिनिधी

**आधुनिक तंत्रज्ञानामुळे आता पूर्वीचे दिवस वृत्तपत्रांमध्ये नाहीत. पूर्वी आपण देत असलेल्या ब्रेकिंग बातम्याचे दिवस आता गेले आहेत, परंतु एक सत्य गोष्ट आहे आपण वेगाला की सत्याला प्राधान्य द्यायचे हे आपण ठरवले पाहिजे. पत्रकारांनी त्या तंत्रज्ञानाचा वापर किती करायचा हे आपणच ठरवले पाहिजे. शेवटी सत्य यामधून स्पष्ट होते, असे मत दैनिक लोकमतचे मुख्य संपादक राजेंद्र दर्डा यांनी व्यक्त केले.**



उदगीर जिल्हा लातूर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून राजेंद्र दर्डा बोलत होते. या उद्घाटन कार्यक्रमाच्या व्यासपीठावर राज्याचे बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आमदार बनसोडे, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलींद आष्टीवकर, शरद काटकर, प्रदेश उपाध्यक्ष गणेश मोकाशे, लातूरचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात बोलताना राजेंद्र दर्डा यांनी वृत्तपत्र चालवणे कसे अवघड आहे. पत्रकारांसाठी आता किती जिकरीचे झाले आहे, यातून पत्रकारांनी, संपादकांनी कसा मार्ग निवडला पाहिजे हे स्पष्ट केले. लोकमान्य टिळक, आगरकर, खांडीलकर, आंबेडकर, यांच्यामुळे मराठी पत्रकारितेला वैभव प्राप्त झाले. परंतु आज ती पत्रकारिता राहिलेली नाही. आता प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे. म्हणजे तो पत्रकार आहे. परंतु त्यावर विश्वास किती ठेवायचा हा भाग वेगळा आहे. आता तर बातमी ब्रेकिंग करण्याचे दिवस गेलेले आहेत. अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघाताची बातमी कोणी ब्रेकिंग केली नव्हती तर एका छतावर खेळणाऱ्या १७ वर्षाच्या मुलाने काढलेल्या व्हिडिओमुळे हा प्रकार पुढे आला. सोशल मीडियाच्या माध्यमातून किंवा यायच्या माध्यमातून केल्या जात असलेल्या ▶▶ पान २ वर



### केंद्रीय कमर्चाऱ्यांसाठी खुशखबर, महागाई भत्त्यात २ टक्के वाढ

दिल्ली । प्रतिनिधी

**केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने शनिवारी (दि.१८ एप्रिल) केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) २ टक्के वाढीला मंजुरी दिली. यामुळे कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता सध्याच्या ५८ टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढला आहे. याचा लाखो कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार आहे.**

याआधी ऑक्टोबरमध्ये महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून ५८ टक्के केला होता. ही वाढ १ जुलै २०२५ पासून लागू करण्यात आली होती. त्यानंतर या वाढीची थकीत रकमेसह अंमलबजावणी करण्यात आली. यामुळे सध्या सेवेतील कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांना याचा लाभ मिळाला. केंद्र सरकारकडून वर्षातून दोन वेळा जानेवारी ▶▶ पान २ वर




### होम लोन पोटगी कमी करण्याचे कारण ठरू शकत नाही - सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**गृह कर्जाचे (होम लोन) हप्ते भरत असल्याचे कारण सांगून पतीला आपली पोटगी देण्याची जबाबदारी झटकता येणार नाही, असे स्पष्ट करत अशा प्रकारची कर्जफेड हा काही अनिवार्य खर्च नाही. पत्नीचा सांभाळ करणे हे पतीचे सर्वात पहिले आणि महत्त्वाचे कर्तव्य आहे. त्यामुळे स्वतःची मालमत्ता वाढवण्यासारख्या आर्थिक बाबींना जोडीदाराच्या उदरनिर्वाहापेक्षा जास्त महत्त्व देता येणार नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.**

लग्नानंतर वर्षभरातच पतीपासून वेगळे राहणाऱ्या पत्नीने, उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे दरमहा ५०,००० रुपयांच्या पोटगीची मागणी केली होती. कौटुंबिक न्यायालयाने ▶▶ पान २ वर

# २१ एप्रिलपासून तब्बल १७ लाख कर्मचारी बेमुदत संपावर

## महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचा इशारा, सकरकारसमोर अडचणी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता देवेंद्र फडणवीस सरकारची डोकेदुखी वाढवणारी मोठी घडामोड समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेनं आक्रमक भूमिका घेत राज्य सरकारविरोधात बेमुदत संपाची हाक दिली आहे.**




राज्यातील सुमारे १७ लाख सरकारी, निमसरकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयामुळे प्रशासनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून सरकारी कार्यालयांतील कामकाज ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संघटनेकडून सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना त्वरित लागू करण्यासह एकूण १७ प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. सरकारसोबत अनेक वेळा चर्चा होऊनही ठोस तोडगा न निघाल्याने अखेर संपाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे समजते. या संपात मंत्रालयीन कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह विविध विभागांतील कर्मचारी सहभागी होणार आहेत. त्यामुळे शाळा, महाविद्यालये, शासकीय ▶▶ पान २ वर

# जुने विधेयक परत आणा, पाहुयात कोण महिला विरोधी

## प्रियांका गांधींनी चांगलेच सुनावले

दिल्ली । प्रतिनिधी

**महिला विधेयकावरून काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वाड्रा यांनी सरकारला खुले आव्हान देत खळबळ उडवून दिली आहे. प्रियांका गांधी यांनी एएनआयशी बोलताना सांगितले की, त्यांनी जुने २०२३ मध्ये पास झालेले महिला आरक्षण विधेयक (कायदा) लागू करावा. यासाठी सोमवारी अधिवेशनात हे विधेयक आणावे त्यावेळी आपण पाहू कोण महिला विरोधी आहे. आम्ही सर्व त्याच्या समर्थनात मतदान करू, अशा शब्दात सरकारला सुनावले.**




लोकसभेत नरेंद्र मोदी सरकारचे १३१ वी घटना दुरूस्ती करणारे विधेयक नामंजूर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी कोण महिला विरोधी आहे हे सांगण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. मोदी सरकारचे गेल्या १२ वर्षातील हे पहिलेच विधेयक आहे जे नामंजूर झाले आहे. त्यानंतर आता कोणाची भूमिका बरोबर ▶▶ पान २ वर

# आता आम्हाला विलीनीकरण नको-रोहित पवार

## दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर स्पष्टीकरण ; मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनात सुषमा अंधारे यांनी घेतली मुलाखत

उदगीर । प्रतिनिधी

**दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरणाचा मुद्दा स्वर्गीय अजितदादा पवार यांनी पुढे आणला होता. त्यावर चर्चाही झाली होती, मात्र आता अजित दादा नाहीत त्यामुळे आम्हाला विलीनीकरण नको आहे, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले.**



उदगीर जिल्हा लातूर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे अधिवेशन सुरू असून, शनिवारी पहिल्या दिवशी दुसऱ्या सत्रामध्ये शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीपूर्वी रोहित पवार यांनी उपस्थित सर्व पत्रकारांना आपले काही प्रश्न असतील तर विचारावे असे म्हटले. यावेळी बोलताना रोहित पवारांनी आता आम्हाला विलीनीकरण नको आहे, असे स्पष्ट केले. विशेष म्हणजे हा विषय अजितदादांनीच पुढे केला होता, आता ते नाहीत त्यामुळे आम्हाला विलीनीकरण नको आहे, असे त्यांनी नमूद केले. शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी राजकारणातील अनेक बारकावे आणि अडचणीत आणणारे प्रश्न देखील विचारले. त्यावर रोहित पवार यांनी हसत हसत, सडेतोड तर काही सहज उत्तरे दिली. काही प्रश्नांची उत्तरे मात्र गोल गोल दिली. या प्रश्न उत्तरांमध्ये महत्त्वाचा विषय ठरला तो रोहित पवारांनी अजित पवारांच्या अपघातावर व्यक्त केलेला संशय. यावर बोलताना रोहित पवार म्हणाले, आम्ही संशय व्यक्त केला आहे, त्याची चौकशी करून आमच्या व्यक्त केलेल्या संशयाचे निराकरण करणे सरकारचे काम आहे. मात्र सरकार ते करू शकत ▶▶ पान २ वर

### खा.अमोल कोल्हे होणार होते संयुक्त राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भात बोलताना रोहित पवार म्हणाले की, हो विलीनीकरणासंदर्भात दादा बरोबर चर्चा झाली होती. मात्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे होणार नव्हते. संयुक्त राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष हे खासदार अमोल कोल्हे यांना करण्याचे ठरले होते, असेही रोहित पवार म्हणाले.

cmyk

## अग्रलेख

# ‘सत्तेच्या सावलीतले बाबा आणि समाजाची अंधश्रद्धेची कैद’

जगाच्या पातळीवर घडणाऱ्या घटनांमध्ये कधी कधी अशा वळणांचा अनुभव येतो, की एका मोठ्या प्रकरणावरून लक्ष हटवण्यासाठी दुसऱ्या अधिक मोठ्या संघर्षाची निर्मिती केली जाते, अशी शंका निर्माण होते. अमेरिकेतील एपस्टिन प्रकरणाने जगभरातील सत्ताधारी, उद्योगपती आणि प्रभावशाली मंडळींच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उभे केले होते. या प्रकरणातील चर्चांनी अनेकांचे चेहरे उघडे पडले. मात्र अचानक जागतिक पटलावर युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आणि त्या चर्चांचा आवाज हळूहळू विरत गेला.

हीच पद्धत स्थानिक पातळीवरही वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येते का, हा प्रश्न महाराष्ट्रातील अलीकडील घटनांमुळे उपस्थित होतो. अशोक खरात या तथाकथित बाबाच्या प्रकरणाने अचानक राज्यात खळबळ उडवली. अनेक राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक स्तरांवरील व्यक्तींशी त्याचे संबंध असल्याच्या चर्चा रंगल्या. काहींचे फोन कॉल, काहींचे फोटो, तर काहींच्या भेटीगाठी यामुळे या प्रकरणाला गूढतेची किनार लाभली. परंतु या सर्व गदारोळात प्रत्यक्षात काय घडले? एका राजकीय महिलेची खुर्ची गेली आणि उर्वरित अनेक जण मात्र सुरक्षित राहिले. यामुळे या प्रकरणामागे केवळ नैतिकतेचा प्रश्न नसून सत्तासमीकरणांचा खेळ आहे का, अशी शंका निर्माण होते.

अंजली दमानिया यांनी केलेले दावे आणि त्यांनी सादर केलेली आकडेवारी हे या चर्चेला अधिक धार देणारे ठरले. कोणत्या व्यक्तीने किती वेळा संपर्क साधला, कोण कुठल्या क्रमांकावर आहे, यामुळे या प्रकरणातील नेटवर्क किती व्यापक आहे, याची झलक मिळते. परंतु या सर्व माहितीचा शेवट कुठे होतो, हा खरा प्रश्न आहे. राज्याच्या मंत्रालयापर्यंत या बाबाचे धागेदोरे पोहोचल्याचा दावा करण्यात येतो. जर हे खरे असेल, तर ही केवळ एका व्यक्तीची फसवणूक नसून संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी बाब आहे. कारण शासन व्यवस्था ही जनतेच्या विश्वासावर उभी असते. जर त्याच व्यवस्थेतील अधिकारी आणि सत्ताधारी अशा भोंदू प्रवृत्तींच्या प्रभावाखाली जात असतील, तर लोकशाहीची पायाभरणीच कमकुवत होण्याचा धोका आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात आजही अशा बाबांची चलती आहे, ही वस्तुस्थिती चिंताजनक आहे. विज्ञान, शिक्षण आणि प्रगतीचा अभिमान बाळगणाऱ्या समाजात अंधश्रद्धा इतक्या खोलवर रुजलेली आहे, हे मान्य करावे लागते. लाखो अनुयायी, कोट्यवधींची संपत्ती आणि राजकीय आश्रय या जोरावर अनेक तथाकथित बाबा समाजावर प्रभाव टाकत आहेत.

इतिहास साक्ष देतो की अनेक तथाकथित आध्यात्मिक गुरुंवर गंभीर गुन्ह्यांचे आरोप झाले, काहींना शिक्षा झाली, तरीही त्यांच्या भक्तांची निष्ठा ढळली नाही. हीच अंधश्रद्धेची खरी ताकद आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा ओळखण्यात समाज अपयशी ठरत आहे. याहून अधिक चिंतेची बाब म्हणजे, कायदा आणि अंमलबजावणी यंत्रणेत असलेल्या व्यक्तींनीही जर या प्रवाहात वाहून जाण्यास सुरुवात केली, तर परिस्थिती अधिकच गंभीर होईल. ज्यांनी समाजाचे संरक्षण करायचे, त्यांनीच विवेक हरवला, तर सामान्य नागरिकांचा आधार कोण? या पार्श्वभूमीवर काही मूलभूत प्रश्न उपस्थित होतात.

अशा प्रकरणांची सखोल चौकशी का होत नाही?

मोठ्या नावांपर्यंत पोहोचताना तपासाची गती का मंदावते?

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, समाज या सगळ्याकडे किती सजगतेने पाहतो? श्रद्धा ही वैयक्तिक बाब असू शकते, परंतु अंधश्रद्धा ही सामाजिक समस्या आहे. तिचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेवर होतो. आज गरज आहे ती केवळ अशा बाबांच्या विरोधात कारवाई करण्याची नाही, तर समाजाला जागरूक करण्याची. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेक यांचा प्रसार हा यावरचा एकमेव उपाय आहे.

अन्यथा, प्रत्येक काही वर्षांनी एखादा ‘खरात बाबा’ उभा राहील, काहींचे बळी जातील, काहींचे नाव पुढे येईल आणि शेवटी सगळे पुन्हा शांत होईल.

मग प्रश्न कायम राहील.‘‘अरे, कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र?’’

# ‘महाराजस्व समाधान शिबिरा’त हजारो नागरिकांना एकाच छताखाली न्याय मिळाला

जालना । प्रतिनिधी

**शासन आपल्या दारी‘‘ या संकल्पनेला अधिक गती देत, महाराष्ट्र राज्य शासन व महसूल मंत्री यांच्या संकल्पनेतून आज मौजे गोंदी (ता. अंबड) येथेछत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ (टप्पा १) अत्यंत उत्साहात पार पडले. अंबड तालुक्यातील हे सहावे अभियान असून, संपूर्ण तालुका प्रशासन आज नागरिकांच्या दारात जाऊन सेवा देण्यासाठी गोंदी मंडळात हजर झाले होते.**



या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या १५ महत्त्वाच्या सेवांसह कृषी, आरोग्य, ग्रामविकास आणि अन्य सर्वच विभागांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या. नेहमी नागरिकांना शासकीय कामासाठी तहसील कार्यालयात जावे लागते, मात्र आज संपूर्ण तालुका प्रशासन गोंदी येथे नागरिकांच्या शोधात आले होते. निराधार योजनेचा आधार शिबिरात पाच दिव्यांग लाभार्थ्यांना जागीच संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला, ज्याद्वारे त्यांना प्रतिमहा २,५०० रुपये मानधन मिळणार आहे. अतिक्रमण नियमानुकूलन अध्यक्षीय समारोपामध्ये तहसीलदार विजय चव्हाण यांनी जानेवारी २०११ पूर्वीची निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. यामुळे गरिबांच्या घरांच्या जागेचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. अंत्योदय व इतर योजना या शिबिरात अंत्योदय अन्न योजनेचे लाभ देण्यात आले, तसेच मोफत रेती वाटप मंजुरी व इतर सर्वच शासकीय योजनांचे लाभार्थ्यांना जागीच वाटप करण्यात आले.मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन सदर अभियान जिल्हाधिकारी आशिमा मित्तलअपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी आणि समन्वयक अधिकारी नम्रता चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले. कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी श्री रमेश मिसाळ यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. आमदार हिकमतदादा उडान यांनी प्रत्येक स्टॉलला भेट देऊन लाभार्थ्यांशी संवाद साधला. तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडेयांनी कृषी योजनांचे सविस्तर मार्गदर्शन केले, तर गट विकास अधिकारी ज्योती कवडदिवे यांनी ग्रामविकास योजनांची माहिती दिली. या प्रसंगी नायब तहसीलदार महेंद्र गिरगे, विश्वास धर्माधिकारी, श्री मुंडे आणि नायब तहसीलदार तालुका पुरवठा निरीक्षक प्रवीण कुमार खांडेभराड यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.जनतेचा उदंड प्रतिसाद आजच्या या सहाव्या शिबिरामध्ये जवळपास १,००० ते १,५०० नागरिकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमास परिसरातील सर्व गावांचे सरपंच, उपसरपंच, लोकप्रतिनिधी आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे अभियान केवळ महसूल सेवेचे नसून, महसूलच्या नेतृत्वाखाली सर्वच तालुकास्तरीय विभागांनी एकत्र येऊन दिलेला हा लोकसेवा यज्ञ आहे. आज गोंदी येथील नागरिकांना त्यांच्या हक्काचा लाभ जागीच मिळाल्याने सर्वसामान्य जनतेत समाधानाचे वातावरण आहे.

# पोलिसांनी जैस्वाल लालाचा गुटखा पकडला लवकरच लाला पोलिसाच्या ताब्यात येणार

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्हयातील अवैधरित्या सन्हाईतपणे गुटखा विक्री करणारे गुन्हेगारावर जालना पोलिसांची ‘‘मिनी मोका‘‘ अंतर्गत कारवाई‘‘ जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जालना पोलीस प्रशासनाकडून सराईत गुन्हेगारांविरुद्ध सातत्याने कठोर कारवाई करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये उत्पादन, वाहतुक व विक्री करण्यास बंदी असलेल्या गुटखा मोठ्या प्रमाणावर विक्री सुरु असल्याने वेळोवेळी छापे घालुन गुन्हे दाखल केलेले आहेत. दिनांक ३१/०३/२०२६ रोजी रात्री सापळा रचून, चंदनझिरा पोलीस ठाणे हद्दीत विशेष कारवाई करण्यात आली. या कारवाईत आरोपीविरुद्ध गुन्हा क्रमांक १९१/२०२६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, सुमारे रुपये ३१,६०,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद गुन्हयातील गुटखा हा जालना जिल्हयामध्ये सहाईत व बेकायदेशिर आणि अवैधरित्या वाहतुक व विक्री करणारा सतीश ऊर्फ लाला जैस्वाल याचा गुटखा असुन तपास सुरु आहेत. तपासामध्ये सतीश ऊर्फ लाला जैस्वाल याचेवर याअगोदर पो. स्टे. सदर बाजार येथे ९, पो. स्टे. कदीम जालना येथे ४, पो. स्टे. तालुका जालना येथे २, पो. स्टे. चंदनझिरा येथे ३, पो. स्टे. बदनापुर येथे १ व पो. स्टे. परतुर येथे १ अशा प्रकारे एकुण २० गुन्हे दाखल असुन बेरचसे गुन्हे न्यायप्रवीष्ट आहेत. भारतीय संहीता कलम १११ च्या तरतुदी प्रमाणे सतीश ऊर्फ लाला जैस्वाल याचा पूर्व इतिहास, सातत्याने गुन्हे करण्याची प्रवृत्ती व स्वतःच्या आर्थिक फायदयासाठी महराष्ट्र राज्यात बंदी असलेला गुटखाजालना जिल्हयामध्ये विक्रीसाठी गुटखा बाहेर राज्यातुन आणुन पुरवत असल्याने आणि त्याचा समाजावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेऊन ‘‘मिनी मोका‘‘ प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालणे व जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्था कायम राखणे हा या कारवाईचा उद्देश आहे. भविष्यातही अशा सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# प्रेरणा काळे हिचे दहावी परीक्षेत ९३.६० टक्के गुणांसह उज्ज्वल यश

माजलगाव । प्रतिनिधी

**येथील छत्रपती नागरी सहकारी पतसंस्थेचे कॅशियर दत्तप्रसाद काळे यांची कन्या कु. प्रेरणा काळे हिने सीबीएसई बोर्डाच्या दहावी परीक्षेत ९३.६० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.**



कु. प्रेरणा काळे हिने ईगलवुड इंग्लिश स्कूलमध्ये सीनियर के.जी. पासून ते दहावीपर्यंतचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून पूर्ण केले. विशेष बाब म्हणजे तिने कोणत्याही खासगी क्लासेसचा आधार न घेता केवळ शाळेतील अध्यापन आणि घरच्या नियमित अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे. निकाल जाहीर होताच प्रेरणाच्या कष्टाचे फळ मिळाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. तिच्या या यशाबद्दल छत्रपती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष जिवनराव जगताप, उपाध्यक्ष सतीश सोळंके, रामप्रसाद काळे, दादासाहेब डाके, तात्यासाहेब शेंडगे, प्रकाश सिरसट, भैय्या थावरे तसेच संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेरणाच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसाठीही ती प्रेरणादायी ठरली आहे.

# बंजारा मुलीचे जबरदस्तीने धर्मांतरण, आरोपी सोहेल शेखला फासावर लटकवा-प्रा.पी.टी.चव्हाण

बीड । प्रतिनिधी

**यवतमाळ जिल्हा पांढरकवडा तालुक्यातील वाघदरा तांडा येथील रहिवासी तथा उच्च शिक्षित बंजारा तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिचे बळजबरीने धर्मांतरण करणारा राजुरा येथील गुंड प्रवृत्तीच्या सोहेल शेख वर त्वरित गुन्हा दाखल करून त्याला फासावर लटकवा अशी रोखठोक मागणी राज्याचे कणखर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री आदरनिय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे राष्ट्रीय बंजारा महासंघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष तथा भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा.पी.टी. चव्हाण यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.याबत अधिक असे की पांढरकवडा तालुक्यातील वाघदरा तांड्यावरील एक तरुणी चंद्रपूर या ठिकाणी एम एस सी चे शिक्षण घेत होती त्याच दरम्यान आरोपी सोहेल शेख यांच्यासोबत तिची ओळख झाली सोहेल यांनी प्रेमाच्या जाळ्यात तिला उडून बळजबरी मुस्लिम धर्मात धर्मांतर केले आहे या घटनेमुळे बंजारा समाजात संतापाची लाट उसळली असून सर्वत्र निषेध व्यक्त केला जात आहे.बंजारा समाजाच्या सर्वच संघटना प्रमुखांनी बंजारा तरुणीला न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलनाची भूमिका घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.**



पीडित मुलीच्या आई-वडिलांनी या घटनेचा विरोध केला असता आरोपी सोहेल शेख यांनी त्यांच्या घरी जाऊन दमदाटी केली, जीवे मारण्याची धमकी दिली.तुमच्या घरातील सर्व सदस्यांना खल्लास करून टाकीन अशी धमकी दिली. तुझ्यासोबत चे सर्व फोटो व्हिडिओ व्हायरल करून तुझी बदनामी करेल अशी धमकी देखील पीडित मुलीला दिली आहे. मुलगी प्रचंड दबावाखाली असून मरणाच्या भितीने ती सर्व अन्याय अत्याचार सहन करीत आहे.राजुरा पोलीस स्टेशनला मुलीच्या आई वडीलांनी लेखी तक्रार दिली आहे, परंतु पोलिसांनी कसलीही कारवाई केली नाही,हि अत्यंत निंदनीय गोष्ट असून पोलीसांच्या कार्यप्रणालीवर शंका निर्माण करणारी बाब आहे..चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.मुमका सुदर्शन यांनी ताबडतोब आरोपी सोहेल शेख याला अटक करावी व कठोर शिक्षा द्यावी. आरोपी विरोधात सर्व लेखी पुरावे असताना देखील त्याला अटक न करणाऱ्या पोलीसांना ताबडतोब बडतर्फ करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे. गुन्हेगारांचे कर्दनकाळ म्हणून प्रसिद्ध असलेले राज्याचे कणखर मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी पिडीत मुलीची आरोपीच्या तावडीतून त्वरित सुटका करून तिला आईवडिलांना सुपूर्द करावे अन्यथा बंजारा समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल,असा इशारा समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. दिवसाढवळ्या आई वडीलांच्या नजरेसमोरून दहशतीच्या जोरावर मुलीचे अपहरण होत असेल तसेच तिचे मनाविरुद्ध धर्मांतरण होत असेल आणि तक्रार दाखल करून देखील पोलीस आरोपी विरोधात काहीच कारवाई करत नसेल तर फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचा वारसा सांगणारा महाराष्ट्र आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणारे महायुती सरकारकडून न्यायाची अपेक्षा करणे गैर व चुकीचे आहे का हा आभाळा एवढा प्रश्न आमच्या मनात निर्माण झाल्याची भावना राष्ट्रीय बंजारा महासंघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष प्रा.पी.टी.चव्हाण यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील सर्व बंजारा संघटना प्रमुखांनी सदरील अपहरण*प्रकरणात *आक्रमक भूमिका घेऊन आंदोलनाची हाक द्यावी . म्हतारी मेल्याचे दुःख नाही,काळ सोकावतो आहे भविष्यात घडणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी हिच ती योग्य वेळ आहे पत्रकावर राष्ट्रीय अध्यक्ष भिकनभाऊ जाधव, राष्ट्रीय उपाध्यक्ष सुबोध पवार, प्रदेश कार्याध्यक्ष मधूकर जाठोत, प्रदेश सरचिटणीस अमोल पवार अभिजीत राठोड यांच्या सह्या आहेत.

# उष्णतेचा येलो अलर्ट

## नागरिकांनी काळजी घ्यावी-नगराध्यक्षा वंदनाताई बोराडे



मंठा । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यात प्रशासनाने उष्णतेचा येलो अलर्ट जारी केला असून आगामी काही दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन मंठा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. वंदनाताई वैजनाथराव बोराडे यांनी केले आहे.**

मुंबईतील कुलाबा येथील प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने दिलेल्या सूचनेनुसार पुढील तीन दिवस तापमानात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी शक्यतो दुपारच्या वेळेत घराबाहेर जाणे टाळावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. उन्हापासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे, शरीर हायड्रेट ठेवावे, तसेच बाहेर पडताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करावा. ओल्या कपड्याने डोके, मान व चेहरा झाकून ठेवावा, असेही त्यांनी सुचवले आहे. शरीरातील पाण्याची कमतरता जाणवल्यास ओआरएस, घरगुती लस्सी, ताक व कैरीचे पन्हे यांसारखे पेय सेवन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. उष्णतेमुळे अशक्तपणा, डोकेदुखी, चक्कर येणे किंवा सतत घाम येणे अशी लक्षणे दिसल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तात्काळ जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा, असेही नगराध्यक्षा वंदनाताई बोराडे यांनी सांगितले आहे.

## पान १ वरून...

### खरीप हंगाम धोक्यात;

या प्रश्नावर तातडीने तोडगा काढला नाही, तर कृषी निविष्ठा संपामुळे राज्यातील लाखो शेतकरी अडचणीत येण्याची शक्यता आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा अधिक संवेदनशील बनला असून, सरकारची भूमिका काय राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------

### केंद्रीय कमर्चाऱ्यांसाठी खुशखबर,

आणि जुलैमध्ये महागाई भत्ता आणि महागाई सवलत यात सुधारणा केली जाते. कर्मचाऱ्यांना महागाईपासून दिलासा देण्याचा यामागील हेतू आहे. प्रस्तावित आठव्या वेतन आयोगाअंतर्गत वेतन रचनेत मोठा बदल करण्याची मागणी कर्मचारी संघटनांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर आता महागाई भत्त्यात वाढीचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारला सादर केलेल्या एका निवेदनात नॅशनल कौन्सिल जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरीकडून ३.८३ इतका फिटमेंट फॅक्टर ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. हा प्रस्ताव स्वीकारल्यास कर्मचाऱ्यांच्या किमान मूळ वेतनात १८ हजार रुपयांवरून सुमारे ६९ हजार रुपयांपर्यंत मोठी वाढ होऊ शकते.

-----------

### ब्रेकिंग बातमीचे दिवस

बातम्या आणि व्हायरल होत असलेल्या बातम्या या किती सत्य असतात हे फार काही वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यामुळे वेगाला की सत्याला प्राधान्य द्यायचे हे आपण ठरवले पाहिजे आणि ते ठरवले तरच आपण आपली पत्रकारिता टिकून ठेवू आणि हे ठरवले तरच खरी पत्रकारिता आपण करत आहोत हे दिसून येईल. कारण इराण - इराकमध्ये झालेल्या युद्धाचे जे काही व्हिडिओ आले होते हे आय वरूनच तयार केले होते. माझे काही मित्र म्हणाले, हे सर्व ९५% खोटे होते. मग आता अशा या ब्रेकिंगला प्राधान्य द्यायचे की त्याची सत्यता पडताळून आपण बातमी छापायची हे आता पत्रकारापुढील मोठे आव्हान आहे, असे दर्डा म्हणाले. यापूर्वी राज्याचे बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार बनसोडे, एसएम देशमुख यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. एसएम देशमुख यांनी पत्रकारांच्या विविध मागण्या मंत्री, नेत्यापुढे मांडल्या. या अधिवेशनाला राज्यभरातून पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यातूनच नव्हे तर कर्नाटक बिदर बेळगाव या ठिकाणाहूनही पत्रकार उपस्थित होते.

-------------

### जुने विधेयक परत आणा,

होती हे सांगण्यासाठी आणि नॅरेशनवर नियंत्रण मिळवण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधीपक्ष दोन्ही कामाला गाले आहेत. प्रियांका गांधी म्हाणाल्या, भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला पश्चिम बंगाल आणि तमिळनाडूमधील मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. या दोन्ही राज्यात या महिन्यात मतदान होणार आहे. यासाठी भाजप विरोधी पक्षांना महिला विरोधी असल्याचं चित्र रंगवत आहे. तमिळनाडूच्या सत्ताधारी डीएमकेने सध्याच्या लोकसभेत महिलांना कोटी देण्याचासाठी देखील विधेयक पटलावर ठेवले. तृणमूल काँग्रेसने जर २०११ च्या जनगणनेवर आधारित पुर्नररचनेशी हे विधेयक जोडले गेले नसते तर आम्ही महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यावरही सरकारचं समर्थन केले असते असे सांगितले. नारी शक्ती वंदन अधिनियम ॲक्ट यानुसार महिलांना लोकसभेत ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे. हा कायदा (विधेयक) लागू न होण्याचे कारण म्हणजे यात भाजप सरकारने यासाठी ताज्या जनगणनेचा आणि मतदार संघ पुर्नरचनेची अट टाकली आहे. त्यामुळे नवी जनगणना आणि मतदार संघ पुर्नररचना झाल्याशिवाय हे महिला आरक्षण विधेयक लागू करता येणार नाही. याबाबत पत्रकार परिषदेत बोलताना प्रियांका गांधी म्हणाल्या की, जर ते याबाबत खरोखरच काही ठोक करू इच्छितात तर त्यांनी २०२३ चे एकमताने पास झालेले विधेयक पुन्हा आणावे. या विधेयकाला सर्व पक्षांनी पाठिंबा दिला होता. हे विधेयक लागू करण्यासाठी त्यात तुम्हाला काही छोट्या दुरूस्ती करण्याची गरज आहे. त्या करा महिलांना त्यांचा अधिकार आताच देऊन टाका. प्रियांका गांधी पुढे म्हणाल्या की, सरकारला वाटले की जर हे बील पास झाले तर ते जिंकले आणि पास झाले नाही तर ते कसे महिलांचे तारणहार आहेत आणि इतर पक्ष कसे महिला विरोधी आहेत याचे ब्रँडिग करता येईल.

---------

### २१ एप्रिलपासून तब्बल १७

रुग्णालये आणि इतर सार्वजनिक सेवांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्य सरकारने १ मार्च २०२४ पासून सुधारित निवृत्तीवेतन योजना लागू केली असली तरी तिची कार्यपद्धती, नियम व अटींबाबत अद्याप स्पष्ट अधिसूचना जारी झालेली नाही. त्यामुळे या कालावधीत निवृत्त झालेल्या हजारो कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर यांनी या संपाची माहिती दिली असून, सरकार २१ एप्रिलपूर्वी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढते का, की राज्यातील प्रशासन आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------

### होम लोन पोटगी कमी करण्याचे कारण

सुरुवातीला ८,००० रुपये पोटगी मंजूर केली होती, जी उत्तराखंड उच्च न्यायालयाने वाढवून १५,००० रुपये केली. मात्र, या रकमेवर समाधानी नसल्याने पत्नीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. कनिष्ठ न्यायालयांनी पतीच्या पगारातून होणाऱ्या कर्जाच्या कपातीला अवाजवी महत्त्व दिले आहे, ज्यामुळे पतीची खरी कमाई कमी दिसून येत आहे. याउलट, पतीचा असा दावा होता की कर्जाच्या दायित्वामुळे हातात येणारा पगार कमी आहे आणि उच्च न्यायालयाने ठरवलेली रक्कम योग्य आहे. यावर न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या खंडपीठाने पुनरुच्चार केला की, पोटगीचा उद्देश जोडीदाराला निराधार होण्यापासून वाचवणे आणि लग्नादरम्यान असलेल्या दर्जाप्रमाणे सन्मानाने जगता येणे हा आहे. पतीची आर्थिक क्षमता आणि पत्नीच्या गरजा यांचा समतोल राखला पाहिजे, परंतु पतीच्या ऐच्छिक आर्थिक गुंतवणुकीला कायदेशीर पोटगीच्या जबाबदारीपेक्षा जास्त प्राधान्य दिले जाऊ शकत नाही. मालमत्ता खरेदीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड ही एक प्रकारची भांडवली गुंतवणूक असते, तिची तुलना अत्यावश्यक किंवा अपरिहार्य खर्चाशी होऊ शकत नाही. पत्नीकडे उत्पन्नाचे साधन नाही आणि ती लग्नानंतर लगेचच वेगळी राहत आहे. तिला सन्मानाने जगता येईल अशी वाजवी रक्कम मिळणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करत पत्नीला मिळणारी पोटगी दरमहा १५,००० रुपयांवरून २५,००० रुपये करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला.

----------

### आता आम्हाला विलीनीकरण

नाही. मी मुंबई, पुणे, बारामती आणि सीआयडी, पोलीस ठाण्यामध्ये जाऊन देखील एफआयआर दाखल केला गेला नाही ही वाईट गोष्ट आहे. अजित दादा हे राज्याची उपमुख्यमंत्री होते तरी देखील त्यांनी मात्र या अपघाताची साधी चौकशी केली नाही. त्यांनी आपल्या अनेक प्रश्नांना उत्तरे देताना थेट राष्ट्रवादीचे नेते सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्यावर निशाणा साधला. त्यांनाच पक्ष ताब्यात घ्यायचा होता, असाही आरोप केला. जे पत्र त्यांनी आयोगाकडे दिले त्यावर कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांना सर्व अधिकार दिले जावेत, असे होते आणि उलट तेच म्हणतात की, रोहित पवारांना पक्ष ताब्यात घ्यायचा होता. सुनिताताईंच्या शपथविधीला का केला नाही, या प्रश्नावर उत्तर देताना रोहित पवार म्हणाले की, दादांचे निधन होऊन चार दिवस झाले नाही मग आम्ही कसे जायचे. ? पदाधिकारी मग आम्ही महाविकास आघाडीचे असताना तिथे कसे जाणार ? जर बारा दिवसानंतर हा शपथविधी ठेवला असता तर कदाचित मी, सुप्रियाताई किंवा मोठे साहेब हे उपस्थित राहिलो असतो, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्याच्या राजकारणाबद्दल बोलताना त्यांनी राजकारण वंगाळ झाले असल्याचे नमूद केले. याशिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक देखील त्यांनी केले. एक चांगले प्रशासक म्हणून त्यांचा त्यांनी उल्लेख केला.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि.१९ एप्रिल २०२६



## थोडक्यात

### माजलगावात श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त व्याख्यानाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी


समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने भगवान श्री परशुराम जन्मोत्सवा निमित्त भव्य व धार्मिक वातावरणात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन दि. १८ एप्रिल २०२६ रोजी रात्री ६ ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. ''भगवान श्री परशुराम कार्य'' या विषयावर होणाऱ्या या व्याख्यानामुळे समाजातील तरुण पिढीला संस्कार व परंपरेची प्रेरणा मिळणार असुन व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक श्री विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहणार आहेत.




भगवान परशुराम हे शौर्य, धर्मनिष्ठा व न्यायप्रियतेचे प्रतीक मानले जातात. त्यांच्या जीवनातील आदर्श व कार्य आजच्या काळातही मार्गदर्शक ठरत असल्याने या विषयावर सखोल मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेशकाका मोगरेकर हे तर व्याख्याते म्हणून संत साहित्य अभ्यासक विश्वंभर धोंडोपंत पाठक (संभाजी नगर) हे उपस्थित राहून भगवान परशुराम यांच्या कार्याचा ऐतिहासिक, सामाजिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून सांगणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुरेश भानप (सचिव, श्री सद्गुरू सेवा समिती, पंढरपूर), डॉ. स्वानंद कुलकर्णी (नेत्रतज्ञ, माजलगाव) हे कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम दि. १८ एप्रिल २०२६ रोजी श्री दत्त मंदिर, समित्र कॉलनी, माजलगाव येथे पार पडणार असून मोठ्या संख्येने ब्राह्मण समाजातील बांधव-भगिनींनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन समस्त ब्राह्मण समाज, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे समाजातील एकोपा वृद्धिंगत होण्यासोबतच धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन होणार असुन युवा पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरत आहेत. दरम्यान व्याख्यानानंतर महाआरती होईल व तद्नंतर प्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.

### कालिका पोदार लर्न स्कुलची जान्हवी सूर्यवंशी प्रथम

पाटोदा : साकत येथील कालिका पोदार लर्न स्कूलने इयत्ता दहावी CBSE शैक्षणिक वर्ष २०२५-२६ परीक्षेत पुन्हा एकदा उज्ज्वल यश संपादन करत १००टक्के निकालाची अभिमानास्पद कामगिरी नोंदवली आहे. शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीमुळे व विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे हा उल्लेखनीय निकाल साध्य झाला आहे. या परीक्षेत जान्हवी सुहास सूर्यवंशी हिने ९८.२०टक्के, गुणांसह जामखेड, पाटोदा व आष्टी या तीन तालुक्यांत प्रथम क्रमांक पटकावला, ज्यामुळे शाळेचा गौरव अधिक वाढला आहे. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट यश संपादन करत शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. प्राजक्ता प्रविण ढगे व समर्थ दीपक धोंडे ९७.६०टक्के, प्रज्वल दत्तात्रय पांढरे व पृथ्वीराज द्रुपदराज डोके ९६.८०टक्के,पिंगळे यश अशोक ९४.२०टक्के, सोहम भिमराव डूचे ९३.२० टक्के, अभिनव सचिन काकडे ९२.६०टक्के, पियुष कैलास माने ९०.४०टक्के, शर्विल विजय झंजाड ९०.४०टक्के व अथर्व बाळासाहेब येडके ९०टक्के यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एकूण ४७ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले, तर १४ विद्यार्थ्यांनी ८० ते ८९% दरम्यान गुण मिळवले. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी ७०% पेक्षा अधिक गुण मिळवले असून शाळेचा एकूण सरासरी निकाल ८२% इतका राहिला आहे.विशेष म्हणजे, मराठी विषयात १० विद्यार्थ्यांनी व आयटी विषयात ५ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले.या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यातही अशीच प्रगती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.




# इंगळे महाराज परमार्थ आश्रमात आजपासून भक्तीचा महासागर

## राज्यभरातून येणार हजारो नामवंत कीर्तनकार, गायनाचार्य, वादक मंडळी, राज्यातील लाखो भाविकांची लागणार हजेरी

वडवणी प्रतिनिधी

महाराष्ट्रात आपल्या विशेष विनोदी शैलीने गाजलेले कीर्तनकार वै. संत बाबासाहेब महाराज इंगळे यांच्या निधनाला आज पाच वर्षे पूर्ण होत आहेत. अक्षय तृतीयेच्या दिवशीच ज्यांचा जन्म झाला होता आणि मृत्यू देखील याच तिथीला झाल्यामुळे त्यांच्या पुण्यतिथीला विशेष महत्त्व आहे. यांच्या पुण्यतिथीनिमित्त चिंचवडगाव येथील संत इंगळे महाराज परमार्थ आश्रमामध्ये आज रविवार दि. १९ ते २६ एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताह सोहळ्यात राज्यातील ख्यातनाम कथाकार, नामवंत किर्तनकार सेवा करणार आहेत. त्यामुळे या अखंड हरिनाम सप्ताहाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाची जय्यत तयारी झाली असुन, या कार्यक्रमाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन संत बाबासाहेब महाराज इंगळे यांचे चिरंजीव श्री सोपानकाका महाराज इंगळे यांनी केले आहे.







वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथे बाबासाहेब महाराज इंगळे यांनी परमार्थ आश्रमाची स्थापना केलेली आहे. धार्मिक क्षेत्रामध्ये खूप मोठे कार्य केले आहे. बाबासाहेब महाराज इंगळे हे आपल्या विनोदी कीर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि इतर राज्यांतही प्रसिद्ध झाले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घराघरात त्यांना भाविक ओळखत होते. विविध चॅनलवर त्यांचे कीर्तन दररोज ऐकायला मिळत होते. महाराष्ट्रातील कोट्यवधी भाविक संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचा विशेष भक्तगण तयार झाला होता. कोरोनाच्या महामारीत अक्षय तृतीयाच्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. परंतु त्यांचे अंतिम दर्शन भाविकांना घेता आले नव्हते. यावर्षी आज अक्षय तृतीयेच्या दिवशी त्यांची पाचवी पुण्यतिथी आहे. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने भव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि रामायण कथा आयोजित केली आहे. महाराष्ट्रात गाजलेले रामायनाचार्य मधुकर महाराज गायकवाड डिग्रसकर यांच्या वाणीतून आठ दिवस रामायण कथा ऐकायला मिळणार आहे. तर महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची दररोज संध्याकाळी कीर्तने ऐकायला मिळणार आहेत. या सप्ताह सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन संत इंगळे महाराज यांचे चिरंजीव सोपान काका महाराज आणि चिंचवडगाव व पंचक्रोशीतील गावकऱ्यांनी केले आहे.

जन्म ते मृत्यू अक्षय तृतीया

संत बाबासाहेब महाराज इंगळे यांचा जन्म अक्षयतृतीयेला झाला. त्यांनी इंगळे महाराज परमार्थ आश्रमाची स्थापना अक्षयतृतीयेला केली. या ठिकाणी बांधण्यात आलेल्या मंदिराचे कळसारोहण कार्यक्रम अक्षयतृतीयेला केला आणि त्यांचा मृत्यू देखील अक्षयतृतीयेलाच झाला. या सर्व योगाच्या गोष्टी अक्षयतृतीयेला घडल्या असल्यामुळे त्यांच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम देखील अक्षयतृतीयेलाच करण्यात आला होता.

**नामवंत कीर्तनकारांची कीर्तने**

या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये राज्यातील नामवंत कीर्तनकार हजेरी लावणार आहेत. रविवार दि. १९ एप्रिल रोजीपासून अनुक्रमे श्री.ह.भ.प. राजेंद्र महाराज सरवदे सकंनपुरी, श्री.ह.भ.प. विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे काडीवडगाव, श्री.ह.भ.प. कीर्तनकेसरी पांडुरंग महाराज गिरी नाशिक,

श्री. ह.भ.प. रामकृष्ण महाराज लोहगावकर श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री.ह.भ.प. विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे, श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर जळगाव, श्री. ह.भ.प. युवकवीर ज्ञानेश्वर महाराज पठाडे कर्जत, श्री.ह.भ.प. वारकरी भूषण अनिल महाराज पाटील बार्शी यांची कीर्तने दररोज रात्री ८:०० ते १०:०० या वेळेत होणार आहेत. तर रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९:०० ते ११:०० वा. श्री.ह.भ.प. सोपान महाराज इंगळे शास्त्री अध्यक्ष इंगळे महाराज परमार्थ आश्रम,

चिंचवडगांव यांचे काल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसाद चिंचवडगाव ग्रामस्थांच्या वतीने होईल.

# शहरातील डीपीरोड,ओपनस्पेससह ९९ कोटीच्या होत असलेल्या बोगस पाईपलाईनची कामाची तात्काळ चौकशी व्हावी

## नगरपरिषदेला निवेदनाद्वारे सय्यद सलीमबापू यांचा उपोषणाचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील डीपी रोड ओपन स्पेससह सात ठिकाणी होणाऱ्या ९९ कोटीच्या बोगस पाईपलाईनच्या कामासोबत बोगस रस्त्याची तात्काळ चौकशी करून संबंधित दोशी व्यक्तींवर गुन्हे दाखल करावेत नसता लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालयासमोर मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी उपोषण करण्यात येणार असा इशारा आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सय्यद सलीमबापू यांनी नगरपरिषदेला निवेदनाद्वारे दिलेला आहे.



यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव येथील सध्या नव्यान्नव कोटीचे बोगस पाईप लाईनचे काम चालु आहे.जुनी पाईप लाईन कोणती तसेच नवीन पाईप लाईन कोणती याचा शोध होत नाही. अतिशय निकृष्ट दर्जाचे पाईप लाईनचे काम चालु आहे.तसेच सध्या सात डिपीरोडचे देखील काम अतिशय बेकायदेशीर व निकृष्ट दर्जाचे अंदाज पत्रकाप्रमाणे काम होत नाही.नगर परिषद विरुध्द जिल्हाधिकारी बीड यांनी समिती गठन केलेली आहे त्या समितीची चौकशी झाल्याशिवाय कोणतेही कामाचे वाटप करण्यात येवु नये. तसेच आपण समितीचे अध्यक्ष एस.डी.ओ. साहेब माजलगाव यांना चुक व खोटी माहिती देवुन अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.सन २०२० ते २०२५ पर्यंत किती गुंठेवारी झाली याची माहिती व पावती पुस्तक तसेच बुक नंबर २१ ची नक्कल ताबडतोब देण्यात यावी.डिपीरोड व ओपन स्पेसची जागेवरील अतिक्रमण काढुन सदरील जागा मोकळ्या करण्यात याव्यात.नगर परिषेदेमध्ये भोगवटदार पिटीआरचे किती रजिस्टर्ड आहेत याची माहिती देण्यात यावी व भोगवटदाराच्या पिटीआर उपलब्ध करुन देण्यात याव्या.मुख्याधिकारी माजलगाव हे माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत.तसेच भ्रष्टअधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत.चौकशी समितीची माहिती देण्यास देखील टाळाटाळ करीत आहे.त्यामुळे वरील गृहिती ताबडतोब पुरविणे नसता दि. २१ एप्रिल २०२६ रोजी आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने सकाळी ११.०० वाजता अमरण उपोषण करण्यात येईल.असा इशारा आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष तथा आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सय्यद सलीमबापू यांनी दिला आहे.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### बालविवाह कराल तर

गंभीर आहे. आजच्या बदलत्या काळात शिक्षण , समान संधी आणि महिलांचे सशक्तीकरण यावर भर दिला जात असताना बालविवाहासारख्या प्रथा समाजाच्या प्रगतीला अडथळा ठरतात . त्यामुळे केवळ कायद्याची अंमलबजावणी न करता सामाजिक मानसिकतेत बदल घडवणे अत्यावश्यक आहे, असे तहसीलदार बीड चंद्रकांत शेळके व तालुका महीला व बाल विकास अधिकारी बीड मन्सूरी.ए.एन.यांनी सांगितले.एकूणच , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेली ही मोहीम ही केवळ कारवाईपुरती मर्यादित नसून सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवणारी आहे. जागरूक नागरिक , सक्रिय प्रशासन आणि सामूहिक जबाबदारी यांच्या बळावरच बालविवाहमुक्त समाज घडवणे शक्य होईल , असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### गेवराईत अवैध 'मावा'

अजय गाढे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच भारतीय न्याय संहिता (इछड) मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोउपनि राम खोत, पोउपनि संजय उदगिरकर, पोलीस अंमलदार कल्याण राठोड, गणेश घोलप, अशोक हंबर्डे, गोरख डोके, जितेंद्र ओव्हाळ, महिला पोलीस अंमलदार कोंता शेळके आणि अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे यांचा समावेश होता. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय उदगिरकर करत आहेत.

### माजलगाव मठातील रक्तदान

व भाविकांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. समाजोपयोगी या उपक्रमातून अनेक रूग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. लिंगैक्य श्री गुरू तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशिर्वादाने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थान मठाचे स्वयंसेवक व सर्व सहकार्य करणाऱ्यांचा श्रीगुरूंच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये भाविकभक्तांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

### प्राथमिक आरोग्य

असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या परिस्थितीमुळे आरोग्य केंद्र 'आओ जाओ घर तुम्हारा' अशा अवस्थेत असल्याची टीका ग्रामस्थांकडून केली जात आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यावश्यक असलेल्या आरोग्य सेवेत असा हलगर्जीपणा होत असल्याने प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित डॉक्टरांना योग्य त्या सूचना द्याव्यात, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात नियमित व सुरळीत आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

### केज येथील ट्रॅक्टर

पोलिसांनी १७ एप्रिल रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. आरोपीने चोरी केलेला ट्रॅक्टर शेतात लपवून ठेवला होता. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून ५ लाख ७० हजार रुपये किमतीचा ट्रॅक्टर आणि ट्रॉली जप्त केली आहे. आरोपीसह मुद्देमाल पुढील तपासासाठी केज पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोउपनि महेश विघ्ने, जफर पठाण, बप्पासाहेब घोडके, दिलीप गिते, विकी सुरवसे, गणेश मराडे आणि विकास राठोड या पथकाचा सहभाग होता.

### दौलावडगाव येथे कराळेवस्ती

अल्पावधीतच नव्या पुलाचे काम पूर्ण झाल्याने गावकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कामामुळे स्थानिक पातळीवर विकासाला चालना मिळणार असून भविष्यातील पायाभूत सुविधांसाठीही हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. लोकार्पण सोहळ्यावेळी कृषिभूषण बाबासाहेब पिसोरे, माजी सभापती अशोक इथापे, संचालक मुरलीधर फसले, कारखेल सरपंच रघुशेठ घुले, अशोक दहातोंडे, शिवाजी थोरात, सुखदेव खकाळ, सालेवडगाव सरपंच महेश कराळे, रावसाहेब शिरसाठ, घाटा पिंपरी सरपंच मोहन आमटे, नाना आमले, अजिनाथ वायभासे, प्रशांत फसले, बबलू कुरेशी, एकनाथ वाणी, गोटीराम कोहोक, वहाब पटेल, जलील कुरेशी, प्रवीण वाणी, अभिमन्यू परभणे, सुमित फसले, महादेव थोरात यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पुलाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही अशाच विकासकामांना गती देण्याची अपेक्षा व्यक्त केली.

आकर्षक रोषणाईने उजळला कराळेवस्ती नदीवरील नवा पूल; नागरिकांचे वेधले लक्ष

दौलावडगाव येथील कराळेवस्ती नदीवरील नव्याने उभारण्यात आलेल्या पुलावर करण्यात आलेल्या आकर्षक रोषणाईने परिसरातील नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना लावण्यात आलेल्या रंगीबेरंगी लाईट्समुळे सायंकाळच्या वेळेस संपूर्ण परिसर झगमगून निघत असून, पुलाचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे.या रोषणाईमुळे केवळ पुलाची शोभा वाढली नसून रात्रीच्या वेळेस प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठीही अधिक सुरक्षितता निर्माण झाली आहे. गावातील नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत पुलाच्या कामासोबतच करण्यात आलेल्या या प्रकाश व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केले आहे. सध्या अनेक नागरिक सायंकाळच्या वेळी पुलावर येऊन या रोषणाईचा आनंद घेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

### अत्याधुनिक पद्धतीचा

ऋषिकेश भीसे आर्यन सुरवसे, सुदर्शन कापरे,गणेश सावंत,यशराज काळकुटे,मनीष देशमुख या विद्यार्थ्यांनी बनवले आहे.

या विद्यार्थ्यांचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष गणपत व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य, सहसचिव प्रा.भीमाशंकर शेटे, संचालक प्रताप पवार,प्राचार्य रमण देशपांडे,ऑटोमोबाईल विभाग प्रमुख प्रा.बप्पासाहेब सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे.

## गंगामसला येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त समिती स्थापन; विविध कार्यक्रमांचे आयोजन

माजलगांव । प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे यंदाही तालुक्यातील गंगामसला येथे विश्वभूषण, महामानव, बोधिसत्व, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी बहुजन विकास मोर्चाचे ज्येष्ठ नेते विठ्ठलदादा पंडित यांच्या अध्यक्षतेखाली जयंती उत्सव समितीची निवड करण्यात आली.



या समितीच्या अध्यक्षपदी हनुमान मेंडके यांची निवड करण्यात आली असून, उपाध्यक्षपदी पंकज पंडित, सचिवपदी अमर साळवे, सहसचिवपदी विश्वजित गवळी, तर कोषाध्यक्षपदी कुणाल पंडित यांची निवड करण्यात आली आहे. सदस्य म्हणून विशाल साळवे, शरद पंडित, प्रकाश साळवे यांची निवड करण्यात आली. या बैठकीस ग्रामपंचायत सदस्य पंकज पंडित यांच्यासह सत्यभान गवळी, मुंजाजी गवळी, सिद्धार्थ हिरवे, मुरलीधर खोपे, अनंत साळवे, बंडू पंडित, बन्सी पंडित, रमेश गवळी, सुनील पंडित, अर्जुन पंडित, सोनाजी गवळी, गौतम साळवे, रमेश पंडित, तुळजीराम पंडित, विजय साळवे, नारायण पौळ आदींसह गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये रक्तदान शिबिर, रांगोळी स्पर्धा, भाषण स्पर्धा तसेच भीमगीतांचा ऑर्केस्ट्रा यांचा समावेश आहे. तसेच, दिनांक २७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता फटाक्यांची आतिषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात फुलांची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

## दिंद्रुड येथे महाराजस्व शिबिरात शेकडो लाभार्थ्यांना लाभ जनतेची कामे करण्यासाठी प्रशासन सज्ज: तहसीलदार रुईकर

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन महसूल प्रशासनाच्या वतीने शुक्रवारी करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो लाभार्थ्यांनी आपल्या विविध कागदपत्रांचा लाभ घेतला असून प्रशासन जनतेची कामे करण्यासाठी सदैव सज्ज असल्याचे मत तहसीलदार संतोष रुईकर यांनी व्यक्त केले.



तहसीलदार संतोष रुईकर, तालुका कृषी अधिकारी गणेश बादाडे, तालुका आरोग्य अधिकारी मधुकर घुबडे, गट विकास अधिकारी ज्योत्सना मुळीक, तालुका उपाधिक्षक भुमी अभिलेख अधिकारी उध्दव सानप यांच्यासह तालुका विविध प्रशासकीय कार्यालयाचे अधिकारी या शिबिरास उपस्थित होते. या शिबिरात ३३ फेरफार, सात सात बारा दुरुस्तीचे प्रकरणे निकाली काढण्यात आले. १४७ सातबारा, १३४ ८ अ सह विविध प्रकारचे ८३ दाखले वितरित करण्यात आले, पुरवठा विभागाच्या वतीने ५५ इ शिधापत्रिका, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे ७५ स्मार्ट कार्ड, ऊसतोड १७ मजुरांची नोंदणी, ५ शेत रस्ता सातबारा नोंदी, संजय गांधी श्रावण बाळ अर्थसहाय्य योजनेच्या ६२ मंजूर प्रकरणाचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात आले. एक खिडकी योजनेअंतर्गत ९६ प्रकरणे निकाली काढण्यात आले.

आरोग्य विभागाच्या वतीने आयुष्यमान भारत कार्ड वाटप करण्यात आले, या शिबिराचे आयोजन महसूल मंडळाधिकारी फुलचंद हंगे सह दिंद्रुड ग्राम महसूल अधिकारी प्रमोद चव्हाण सह श्यामसुंदर गीते,वांगी सज्जा, लक्ष्मण सोन्नर बेलोरा सज्जा, विलास मोरे नाकलगाव सज्जा वैदेही चौरे सिमरी पारगाव सज्जा आदींनी केले होते. येथील जिल्हा परिषद शाळेतील केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, मुख्याध्यापक मंचक सोळंके, सहशिक्षक मनोहर कटारे, पांडुरंग वाकसे, सुमंत कटारे सह शिक्षक वृंदांनी शिबिर संपन्न करण्यासाठी मेहनत घेतली.

# शाहू महाराज शैक्षणिक संकुलामध्ये डॉ.आंबेडकर राजर्षी शाहू आणि महात्मा फुले यांच्या संकल्पनेतील शैक्षणिक कार्याचा परिचय

## मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला बक्षीस वितरण सोहळा

आष्टी । प्रतिनिधी

शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी यांचे वतीने साईज्ञान प्राथमिक व माध्यमिक इंग्लिश स्कूलमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने तालुकास्तरीय विविध शैक्षणिक आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, प्रमुख अतिथी केंद्रप्रमुख धर्मराज शिंदे, शेळके सर,मुख्याध्यापक संतोष दाणी, डॉ.नदीम शेख, पत्रकार अविशांत कुमकर तर अध्यक्षस्थानी शाहू महाराज शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुखदेव पोकळे हे उपस्थित होते.. परितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन करताना प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे म्हणाले की, शाहू महाराज सेवाभावी संस्था आणि शिक्षण प्रसारक मंडळ या संकुलामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राजर्षी शाहू महाराज आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संकल्पनेतील शैक्षणिक कार्य सुरू असून सुखदेव पोकळे यांचे गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी अतुलनीय योगदान आहे असे सांगितले मुख्याध्यापक संतोष दाणी यांनी मनोगत व्यक्त



करताना साईज्ञान इंग्लिश स्कूलमध्ये अनाथ मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी संस्थापक अध्यक्ष सुखदेव पोकळे आणि सर्व शिक्षक अत्यंत प्रामाणिकपणे पार पडत असून त्यांच्या कार्यातून जगद्गुरु संत तुकाराम छत्रपती शिवाजी महाराज महात्मा गांधी यांचे स्वप्न साकार होत असून रंजल्या गांजल्यांची सेवा करणारा खरा संत असतो त्याप्रमाणे गरीब आणि होतकरू अनाथ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची पवित्र कार्य हे संस्था करीत असून या संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये उद्याचे महापुरुष दडलेले आहेत असे सांगितले तर सविस्तर मार्गदर्शन करताना केंद्रप्रमुख धर्मराज शिंदे म्हणाले की या शाळेला शासनाचा एक रुपयाही अनुदान मिळत नाही तरीही आपल्या सामाजिक कार्याची जाण ठेवत संस्थेचे अध्यक्ष पोकळे यांनी या अनाथ विद्यार्थ्यांच्या राहण्याची शिक्षणाची अत्यंत उत्कृष्ट सोय केली असून त्यासाठी असणारी दानत त्यांच्याकडे आहे .समाजामध्ये अनेक श्रीमंत लोक आहेत परंतु ते एका हाताने घेऊन स्वतःसाठी साठवून ठेवतात परंतु पोकळे हे स्वतः दिव्यांग असूनही अनाथ व दिव्यांगाची जाणीव ठेवून एका हाताने घेऊन दुसऱ्या हाताने ते दान करत आहेत हे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य असल्यास त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना डॉक्टर नदीम शेख म्हणाले की सुखदेव पोकळे यांचे कार्य अद्वितीय असून गोरगरिबांच्या मुलांसाठी त्यांनी अनेक सुविधा निर्माण केल्या आहेत शाहू महाराज सेवाभावी संस्था आणि शिक्षण प्रसारक मंडळाचे १७ घटक शाळा असून साई ज्ञान प्राथमिक व माध्यमिक इंग्लिश शाळेच्या वतीने तालुकास्तरीय भारतीय संविधानाची ओळख ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले तसेच या शैक्षणिक संकुलातील उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार शिक्षक बी.बी. राख शिवाजी नलावडे आणि अक्षय गायकवाड यांना प्रदान करण्यात आला तर उत्कृष्ट कर्मचारी म्हणून विठ्ठल कर्डिले यांना गौरवण्यात आले. या कार्यक्रमासाठी छत्रपती शाहू महाराज अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय धनंजय शाहू महाराज कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य बीबी राख शाहू महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे साईज्ञान इंग्लिश स्कूलचे प्राचार्य संतोष काशीद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गांधले सर यांनी केले तर उपस्थित त्यांचे आभार दळवी सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिक्षक विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वादळी पावसाचा ५ दिवस अंदाज

## विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये २ दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा

पुणे : राज्यात आजपासून ढगाळ हवामानासह वादळी पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भातील काही भागात उष्णतेची लाट आहे. राज्यात पुढील ५ दिवस पावसाला पोषक वातावरण राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचा अंदाज आहे. सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड जिल्ह्यात ढगाळ हवामानासह वादळी पावसाचा अंदाज आहे. परभणी, हिंगोली, नंदूरबार, धुळे, कोल्हापूर, पालघर, रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या सरींची शक्यता आहे. विदर्भातील वाशीम, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा आणि उस्मानाबाद जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा अंदाज देण्यात आला आहे. पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर,



कोल्हापूर, रायगड आणि पालघर जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानसह हलक्या सरींची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा अंदाज देण्यात आला आहे. सोमवारी मध्य महाराष्ट्रातील सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार, कोल्हापूर तर मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली जिल्ह्यात विजांसह वादळी पावसाची शक्यता आहे. तर विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातही काही ठिकाणी विजांसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर बीड, छत्रपरती संभाजीनगर, जालना, परभणी, रायगड आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. मंगळवारी सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार तर कोकणातील सिंधुदूर्ग, रायगड आणि रत्नागिरी तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली तसेच विदर्भातील यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. तर बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, सिंधुदूर्ग, ठाणे जिल्ह्यात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. बुधवारीही काही ठिकाणी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## पावसाळ्यात असे करा दुधाळ जनावरांचे संगोपन


पावसाळ्यामध्ये आर्द्रता तसेच जमिनीतील ओलसरपणा वाढायला लागतो. हे वातावरण वेगवेगळ्या प्रकारच्या जिवाणू आणि विषाणूंच्या वाढीकरिता अनुकूल असून, त्यामुळे जनावरांच्या प्रजनन संस्थेमध्ये अनेक विपरीत परिणाम दिसून येतात. उदा. जनावरे वारंवार उलटणे, गाभण न राहणे, माज न दाखवणे.

पावसाळ्यात गोठ्यामध्ये गोचीड, पिसवा, माश्या, डासांचे प्रमाण वाढायला सुरुवात होते. यांच्या प्रादुर्भावामुळे अनेक प्रकारचे आजार होण्याची शक्यता असते. जनावरांच्या पोटामधील जंत वाढायला सुरुवात होते, त्यामुळे दुधाळ जनावरांना, वेळोवेळी जंतनाशक देणे आवश्यक असते. आठवड्यातून एकदा संपूर्ण गोठयामध्ये जंतुनाशकाची फवारणी करावी. गोठ्याच्या भिंती, टणक पृष्ठभाग आणि गव्हाणी जाळून घ्याव्यात. पावसाळ्यात लसीकरण करावे. गोठ्यामध्ये ज्या ठिकाणी पावसाच्या पाण्याची गळती असेल त्याची त्वरित दुरुस्ती करावी. गोठ्यामधील दुर्गंधीयुक्त वातावरण असू नये याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यात गोठ्यातील पृष्ठभाग ओला असेल, तर जनावर घसरून पडण्याची शक्यता असते. याकरिता गोठ्यातील जमीन कोरडी ठेवावी. जनावरांच्या खुरांची नियमित तपासणी करावी.

आहार व्यवस्थापन : चारा किंवा खाद्य साठवणूक स्वच्छ व हवेशीर ठिकाणी असावी. चारा साठवणूक असलेले ठिकाण ओले असेल तर पावसाळ्यामध्ये बुरशीचा प्रादुर्भाव दिसतो. बुरशीयुक्त खाद्य जनावरास दिल्यास आजार होतात, दुग्ध उत्पादन कमी होते, विषबाधा होते. गाभण जनावरांमध्ये गर्भपात होऊ शकतो. हिरवा व वाळलेला चाऱ्याचे योग्य संतुलन करावे. जनावरांना समतोल आहार देणे आवश्यक आहे. उदा. ५०० किलो वजनाच्या दुभत्या गाई, म्हशींसाठी २० ते २२ किलो हिरवा चारा, ५ ते ६ किलो कोरडा चारा आणि ६ ते ७ किलो पशुखाद्य (दुधाच्या प्रमाणात) द्यावे. पावसाळ्यात दुधाळ जनावरांमध्ये कासदाह दिसतो. हे टाळण्यासाठी दूध काढण्या अगोदर आणि नंतर, जंतुनाशक द्रावणांनी सड, कास स्वच्छ करावी. गाभण जनावरांना जास्त प्रमाणात हिरवा चारा दिल्याने मायांग बाहेर पडण्याचे प्रमाण वाढते. यासाठी समतोल आहार देणे आवश्यक आहे. दुधाळ गाई, म्हशींना दूध उत्पादनाचा ताण असतो. सोबतच वातावरणाचा ताण पडला, तर आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन प्रजनन प्रक्रिया आणि दूध उत्पादनावर वाईट परिणाम दिसून येतो. पावसाळ्यातील प्रजनन संस्थेविषयी आजार टाळण्यासाठी दुधाळ गाई, म्हशींची योग्य काळजी, गोठा स्वच्छता, निर्जंतुकीकरण, स्वच्छ पाणी आणि समतोल आहार देणे हे अतिशय आवश्यक आहे.



## पावसाळी कारले लागवड; हे आहेत प्रमुख वाण, मिळेल जबरदस्त उत्पन्न!



खरीप हंगामात पहिला पाऊस पडताच अनेक शेतकऱ्यांची पेरणीसाठी लगबग सुरु होणार आहे. मात्र, पारंपरिक पिकांमधून शेतकऱ्यांना खर्च वजा जाता जास्त काही मागे उरत नाही. काही वेळा तर पिकांवर रोग पडल्यास किंवा पारंपारिक पिकांचा कालावधी जास्त असल्याने, अतिवृष्टी झाल्यास शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही. परिणामी, आता शेतकऱ्यांनी आधुनिक होण्याची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर पावसाळ्याच्या दिवसांत शेतकरी कारले या भाजीपाला पिकाच्या लागवडीतून चांगली कमाई करू करतात.

हायब्रीड कारले लागवड : हायब्रीड कारल्याच्या सदाहरित वाणांच्या लागवडीसाठी हवामानाचे कोणतेही बंधन नसल्याने अनेक शेतकरी संकरित कारली वेगवेगळ्या भागात पिकवून चांगला आर्थिक नफा मिळवत आहेत. हायब्रीड कारल्याच्या फळाची लांबी १२ ते १३ सेमी आणि वजन ८० ते ९० ग्रॅम पर्यंत असते. एक एकर शेतात हायब्रीड कारले पिकवल्याने ७२ ते ७६ क्विंटल उत्पादन मिळते, जे सामान्यपेक्षा खूप जास्त आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आर्थिक उत्पन्न मिळवण्यास मदत होते.

'या' आहेत प्रमुख जाती : विशेषत: प्रिया आणि कोईम्बतूर लवंग या संकरित कारल्याच्या जाती उत्पादनाच्या बाबतीत अव्वल आहेत. याशिवाय पुसा ते मोसमी, पुसा स्पेशल, कल्याणपूर, कोईम्बतूर लांब, कल्याणपूर सोना, बारमाही कारला, प्रिया सीओ-१, एसडीयू-१, पंजाब कडू-१, पंजाब-१४, सोलन हारा, सोलन आणि बरहामास इ. कारल्याच्या सर्वोत्तम जाती देखील शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपयुक्त आहेत.

एवढे लागते हेक्टरी बियाणे : उत्तम निचरा होणारी वालुकामय चिकणमाती माती संकरित कारल्याच्या लागवडीसाठी उत्तम आहे. कडू वेल मध्यम उष्ण तापमानात फुलतात. एक हेक्टर क्षेत्रामध्ये कारल्याच्या लागवडीसाठी १.८ ग्रॅम बियाणे आवश्यक आहे, ज्याची लागवड रोपवाटिकेत बीजप्रक्रिया केल्यानंतरच करावी. रोपवाटिकेमध्ये रोपे तयार केल्यानंतर शेत सेंद्रिय पद्धतीने तयार करून कडबा रोपांची ओळीत लागवड करावी. वेल व्यवस्थित पसरवण्यासाठी शेतकरी स्टेजिंग बनवतात, ज्यामुळे उत्पादन आणि उत्पादकता दोन्ही वाढते.

# युरिया खताला पर्यायी खते

इराण- इस्त्राईल- अमेरिका युद्धाची झळ आपल्याला दैनंदिन दिवसात बसत आहे. महागाई वाढली, आयात निर्यातीवर परिणाम झाला आणि इंधनाच्या उपलब्धेवर टांगती तलवार आली. अशातच खरिपाचा हंगाम काही दिवसात सुरु होईल. त्यासाठी खतांची गरज पडणार यामुळे खत कंपन्यांनी युरियाची किंमत वाढवली आहे. त्यामुळं आता आपल्याला पर्यायी उपाय शोधण्याची गरज आहे. युरिया हे रासायनिक खत आहे. यामध्ये ४६ टक्के नत्र हे अन्नद्रव्य असते. युरिया खत उघड्या जमिनीवर टाकल्यास त्यातील अमोनिया हवेत उडून जातो. फार कमी प्रमाणात नत्र पिकांसाठी उपलब्ध होतो. नत्र हे केवळ युरिया या एकाच खतामध्ये नसते तर सेंद्रिय खते, जिवाणू खते, आणि इतर रासायनिक मिश्र खतांमध्ये असते.

सेंद्रिय खते :सेंद्रिय खतांमध्ये शेणखत, गांडूळखत, हिरवळीचे खत, निंबोळी पेंड हे पर्याय आहेत.. सहसा बरेच शेतकरी आपल्याकडे शेणखताचा वापर करतात.कारण त्यामधअये कुजलेलं शेण आणि पालापाचोळा असतो. त्यामुळं चांगल्या कुजलेल्या एक टन शेणखतात साधारणत: ५ ते ६ किलो नत्र असतो. यासोबत ३.५ किलो स्फुरद आणि ७.८ किलो पालाश असते. तसे हे ऐकायला फार कमी वाटू शकते. पण शेतामध्ये शेणखत वापरल्याने आपल्या मातीचे आरोग्य सुधारते. यासारखेच गांडूळखत हेही पोषक तत्त्वांचा



खजिना असते. याच्या वापरामुळे जमिनीत पाणी धरुन ठेवण्याची क्षमताही वाढते. एक टन गांडूळखतात जवळपास १० ते १५ किलो नत्र आढळतो. याशिवाय शेतकरी हिरवळीच्या खतांचा आणि निंबोळी पेंडचा वापर करु शकतात. हिरवळीच्या खतांमुळे जमिनीतला सेंद्रिय कर्बही वाढतो तर निंबोळी पेंड नैसर्गिकरीत्या जमिनीतल्या किडींचे नियंत्रण करते.

जिवाणू खते :यालाच जैव खते असेही म्हटले जाते. कारण यामध्ये सूक्ष्मजीवाणुंचा वापर करुन हवेतील नत्र पिकांसाठी उपलब्ध करुन दिला जातो. यामध्ये ॲझेटोबॅक्टर, ॲझोस्पिरीलियम, रायझोबियम, निळे हिरवे शेवाळ ही जिवाणू खते प्रामुख्याने नत्र खतासाठी वापरली जातात. जिवाणू खते म्हणजेच बायोफर्टिलायझर्समुळे पिकांची रोग प्रतिकारक शक्ती वाढते. जमिनीतील किडींपासून पिकांच्या मुळाचे संरक्षण होते. तसेच मातीचा पोतही सुधारतो. ही खते कृषि विज्ञान केंद्र, खतांच्या दुकानात मिळतात.द्रव सेंद्रिय खते : शेणखत, गांडूळखतासोबत जीवामृत हे देशी गाईचे शेण, गोमूत्र, गूळ, बेसन यांच्यापासून बनलेले असते. हे खत अत्यंत स्वस्त आणि प्रभावी आहे. हे जमिनीत सूक्ष्म जीवांची संख्या वेगाने वाढवते. यामुळे जमिनीचा पोत सुधारतो, पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

इतर रासायनिक खते : युरिया हे एकल खत आहे. परंतु मिश्र खतांमध्ये नत्र हे मुबलक प्रमाणात असते. मिश्र खतांमध्ये नत्र, स्फुरद, पालाश हे तीनही अन्नद्रव्य एकाच खतामध्ये उपलब्ध होतात. यात प्रामुख्याने १८:४५:०० (डिएपी), २०:२०:००:१३, १९:१९:१९, १५:१५:१५, २०:२०:२० या खतांचा वापर करता येतो. ही खते सहसा विद्राव्य स्वरुपातही देता येतात.

कडधान्य पिकांची लागवड : कडधान्यवर्गीय पिकांच्या मुळांवर गाठी असतात. त्या गाठींमध्ये रायझोबियम जिवाणू असतात जे हवेतील नत्र पिकांसाठी उपलब्ध करुन देतात. त्यामुळे कडधान्यवर्गीय पिक जमिनीत नत्र खत मुबलक प्रमाणात तयार होतो. पुढील हंगामातील पिकासाठी हा नत्र उपलब्ध होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१३३६ : दक्षिणेमध्ये विजयनगर हिंदू राज्याची स्थापना झाली.
१३३६ : हरिहर व बुक्क यांनी विजयनगरच्या हिंदू राज्याची स्थापना केली.
१७०३ : औरंगजेबाने सिंहगड ताब्यात घेतला.
१७२० : शाहू छत्रपती यांच्याकडून पहिले बाजीराव पेशवे यांना कर्हाडनजीक मसूर येथे पेशवाईची वस्त्रे मिळाली.
१८३१ : 'यूनिव्हर्सिटी ऑफ अलाबामा' ची स्थापना झाली.
१८५३ : मुंबईहून ठाण्यापर्यंत नियमित रेल्वे सेवा सुरू झाली.
१८९८ : जुलमी प्लेग अधिकारी रँड याचा खून करणारे दामोदर चापेकर यांना फाशी
१९१२ : टायटॅनिकमधील वाचलेले ७०५ प्रवासी घेउन आर.एम.एस. कार्पेथिया जहाज न्यूयॉर्कला पोचले.
१९२३ : पुण्याच्या शिवाजी मंदिरात शिवजयंतीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संगमरवरी अर्धपुतळ्याची स्थापना. हा राज्यातील पहिला शिवपुतळा. या पुतळ्याचे अनावरण मंदिराचे देणगीदार दिवंगत गणेश गोखले यांचे चिरंजीव डॉक्टर महादेव गोखले यांच्या हस्ते करण्यात आले.
१९२४ : सायमन व शूस्टर यांनी पहिले शब्दकोड्यांचे पुस्तक प्रकाशित केले.
१९३० : क्रांतिकारकांनी चितगाव येथील शस्त्रागार लुटले.
१९३० : आज काहीही बातमी नाही असे बी. बी. सी. या नभोवाणी केंद्रावरुन सांगण्यात आले.
१९३६ : पेशव्यांची राजधानी असणार्या पुण्यातील शनिवारवाडा पुरातत्व विभागाकडे सुपूर्त करण्यात आला.
१९५० : आंध्र प्रदेशातील तेलंगणा येथील पोचमपल्ली खेड्यातील ८० एकर जमीनीच्या भूदानाने विनोबा भावे यांची भूदान चळवळ सुरू झाली.
१९५४ : गामल अब्दल नासर याने इजिप्तची सत्ता ताब्यात घेतली.
१९७१ : एअर इंडियाचे पहिले बोईंग ७४७ जंबो जेट विमान 'सम्राट अशोक' शाही दिमाखात सकाळी ८-२० वाजता सांताक्रूझ विमानतळावर दाखल.
२००१ : भूसंलग्न उपग्रह प्रक्षेपक (- १) वाहकाचे रशियन बनावटीच्या क्रायोजेनिक इंजिनाच्या साहाय्याने श्रीहरिकोटा तळावरून यशस्वी प्रक्षेपण

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७४ : सवाई माधवराव पेशवा यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म (मृत्यू: २७ आक्टोबर १७९५)
१८५८ : महर्षी अण्णासाहेब तथा धोंडो केशव कर्वे स्त्रीशिक्षण व विधवा विवाह यातील कर्ते समाजसुधारक, पद्मभूषण, भारतरत्न (मृत्यू: ९ नोव्हेंबर १९६२ मुरुड)
१९०१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी व प्रशासक चंदेश्वर नारायण प्रसाद सिंह यांचा जन्मदिन.
१९१० : विश्वनाथ नागेशकर, भारतीय,गोवेकर चित्रकार.
१९१६ : ललिता पवार अभिनेत्री (मृत्यू: २४ फेब्रुवारी १९९८)
१९६२ : पूनम धिल्लन अभिनेत्री
१९५८ : माल्कम मार्शल वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (मृत्यू: ४ नोव्हेंबर १९९९)
१९९१ : डॉ. वृषाली करी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५९ : क्रांतीवीर तात्या टोपे (रामचंद्र पांडुरंग टोपे).
१९४५ : व्हॅक्यूम ट्यूब चे शोधक जॉन एम्ब्रोस फ्लेमिंग यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १८४९)
१९५५ : अल्बर्ट आइनस्टाइन, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ.
१९५९ : लोकप्रिय भारतीय क्रांतीकारक व पत्रकार बरिंद्र कुमार घोष यांचे निधन.
१९६६ : योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद यांचे निधन. (जन्म: ३० ऑगस्ट १८८३ डभई, गुजराथ)
१९९५ : पंचांगकर्ते आणि ज्योतिषशास्त्राचे व्यासंगी अभ्यासक पंडित धुंडिराजशास्त्री ऊर्फ अण्णा लक्ष्मण दाते यांचे निधन.
१९९९ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघुवीर सिंह यांचे निधन. (जन्म: २२ ऑक्टोबर १९४२ जयपूर)
२००१ : प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि भूगोल आदी विषयातील पार्श्वभूमी असलेले नार्वेशियान लेखक थोर हेयरडाल यांचे निधन.
२००२ : नॉर्वेजियन दर्यावर्दी संशोधक थोर हेअरडल, मानववंशशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म: ६ ऑक्टोबर १९१४)
२००२ : महाराष्ट्र विधान सभेचे अध्यक्ष शरद दिघे यांचे निधन.
२००३ : भारतीय 'हिंदी साहित्यिक व साहित्यकार' सुधाकर पाण्डेय यांचे निधन.

## थारपारकर जातीची गाय दररोज १८ लिटर दूध देण्यास सक्षम

थारपारकर ही त्याच्या विशेष गुणांमुळे दुग्ध व्यवसायासाठी अतिशय उपयुक्त प्राणी आहे. वास्तविक, या जातीच्या गायीमध्ये ४५ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानात जास्त दूध देण्याची क्षमता असते. प्रतिकूल परिस्थितीतही त्याच्या उत्पादन कार्यक्षमतेत काही फरक पडत नाही. जिथे वाढत्या तापमानासह, इतर जातीच्या गाई आणि जनावरांचे दूध उत्पादन २० ते ३० टक्के कमी होते. त्याच वेळी, ही जाती प्रतिकूल परिस्थितीतही अधिक दूध देण्यास सक्षम आहे. त्याची उत्पादनक्षमता इतर जातींपेक्षा चांगली आहे. ती आयुष्यभर १५ मुलांना जन्म देऊ शकते, तर इतर जातींच्या गायी ५ ते १० मुलांना जन्म देऊ शकतात. उष्ण आणि कोरडे हवामान सहन करण्यास सक्षम, या जातीचे आयुष्य २५ ते २८ वर्षे आहे.

या राज्यात आढळतात थारपारकर : ही जात मूळ राजस्थान राज्यातील आहे, ती येथे बाडमेर, जैसलमेर, जोधपूर, जालौन आणि सिरोही भागात आढळते. वास्तविक राजस्थानचा हा वाळवंट प्रदेश आहे, तो थार वाळवंट म्हणून ओळखला जातो. यामुळेच गायीच्या जातीला थारपारकर असे नाव पडले. थारमध्ये आढळणाऱ्या गायींना थारपारकर म्हणतात. राजस्थानमध्ये याला मालानी या नावानेही ओळखले जाते. राजस्थान व्यतिरिक्त, देशाच्या विविध भागांमध्ये त्याचे संगोपन केले जाऊ शकते. पुण्याचे क्लब ऑफ वृंदावन थारपारकरमधील चंद्रकांत भरेकर सांगतात की ते गेल्या ५ वर्षांपासून थारपारकरांचे अनुसरण करत आहेत.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# मर्चंट बँकेला गंडा घालनारा दुसरा आरोपी पकडला

## चेअरमनसह संचालक मंडळावर कारवाई करा

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेची बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअर हाऊस च्या नावे १७७ बनावट खातेदारांच्या माध्यमातुन २३ कोटी ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्या बाबत तक्रार प्राप्त झाल्यावरुन चंदनझीरा पोलीस स्टेशन येथे नमूद प्रकरणात चंदनझीरा गु.र.नं. २२०/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२),३(५) २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे सदर प्रकरणी बँकेचे चेअरमन तसेच संचालक मंडळ यांच्यावर सुद्धा कारवाई करणे गरजेचे आहे असे बोलल्या जात आहे. सदरील प्रकरणी जिल्हा उपनिबंधक व तसेच मर्चंट बँकेचे चेअरमन संचालक मंडळ संगणमत असल्याचे बोलल्या जात आहे. बँकेमध्ये अपहार झाल्याने व सदर अपहाराची रक्कम मोठ्या प्रमाणात असल्याने गुन्ह्याची व्याप्ती बघून पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बंसल व श्री अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी सदर गुन्ह्याबाबत सखोल तपास करण्याचे आदेश




आर्थिक गुन्हे शाखेला दिलेले आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सदर गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार नामे रायचंद सखाराम कुरंगळ यास काल रोजी अटक करून न्यायालयात हजर केल्यानंतर त्याचे आठ दिवस पोलीस कष्टडी मा. न्यायालयाने दिलेली होती त्याच्या चौकशी दरम्यान सदर गुन्ह्यांमध्ये सहभाग असलेला आरोपीनामे निलेश्वर शेषराव भोसले वय ४६ वर्ष सिंदखेड राजा जि. बुलढाणा यास चौकशीकामी ताब्यात घेऊन त्याच्याकडे केलेल्या चौकशी दरम्यान त्याचा गुन्ह्यामध्ये सक्रिय सहभाग निष्पन्न झाल्याने काल दिनांक १६/०४/२०२६ रोजी रात्री उशिरा त्याला अटक करण्यात आली आहे. आज रोजी सदर आरोपीस मा. न्यायालय समोर हजर केले असता मा. न्यायालयाने त्याची ७ दिवस पोलीस काष्टडी दिलेली आहे. सदर गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून त्या अनुषंगाने संशयित तसेच साक्षीदार यांच्याकडे देखील आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी सुरू आहे. सदर कामगीरी ही मा. श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री.सुरेश उनवणे प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिथुन घुगे सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा जालना, शैलेश म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, आणि पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली तर न्यायालयीन कामकाजामध्ये सरकारी वकील नितीन जाधव यांनी कामकाज पाहिले.

## मनपा मुख्यालयात अभ्यागतांसह अधिकाऱ्यांच्या वाहनांना प्रवेशबंदी




छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महापालिका मुख्यालयात गेल्या काही दिवसांपासून पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर आला असून वाहनांसाठी अपुरी जागा असल्याने मनपा प्रशासनाने प्रवेशावर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे. आता नगरसेवकांसह चार अधिकाऱ्यांच्या वाहनांना प्रवेश देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मर्यादित वाहनांनाच परवानगी दिल्याने मुख्यालयाबाहेर वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. शहर हद्दीत दुचाकी, चारचाकी वाहन पार्किंगची व्यवस्था करून देण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. मात्र शहरात वाहनसंख्येच्या तुलनेत पार्किंग व्यवस्था नाही. त्यामुळे वाहनधारकांना रस्त्यावरच वाहन उभी करावी लागत असल्याने जागोजागी वाहतूक कोंडी होत आहे. तसेच गेल्या दोन ते तीन दिवसांपासून मनपा मुख्यालयात नवीन नियम आमलात आणला गेला आहे.

या नियमानुसार मोजक्या नगरसेवकांच्या वाहनांनाच प्रवेश दिला जात आहे. त्याचबरोबर आयुक्त, दोन अतिरिक्त आयुक्त आणि मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांच्या वाहनांनाच आता पार्किंगची मुभा देण्यात आली आहे. मात्र इतर अधिकारी, कर्मचारी आणि अभ्यागतांना बाहेरच वाहन उभे करावे लागत असून त्यातून गैरसोय वाढली आहे. मुख्यालयाबाहेरील रस्त्यांवरही पार्किंगसाठी पुरेशी जागा नसल्याने नागरिकांना वाहन उभे करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे दिवसभर परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होत असून सर्वसामान्यांना त्याचा फटका बसत आहे. तसेच शहराच्या विविध भागांत पार्किंग सुविधा नसताना रस्त्यावर उभ्या वाहनांवर कारवाई केली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. आधी पार्किंगची सोय करा, मगच कारवाई करा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यालयातील पार्किंग निर्बंधामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली असून प्रशासनाने तातडीने पर्यायी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## भर चौकात गोळीबार अन् चाकू हल्ला; गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक संपला?

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी




शहरात गुन्हेगारांचे धाडस इतके वाढले आहे की, त्यांना आता कायद्याचा कोणताही उरलेला पुंडलिक धाक नाही. नगर परिसरातील अत्यंत वर्दळीच्या हनुमान चौकात गुरुवार (दि. १६) रात्री गैंगवारचा भडका उडाला. दोन गटांत झालेल्या तुंबळ हाणामारीत भर चौकात चाकू हल्ला आणि गोळीबार झाला. भर चौकात गोळीबार करण्याची हिंमत या गुन्? हेगारांमध्ये येतेच कशी? आणि गुन्? हेगारांवर पोलिसांचा वचक राहिला आहे की नाही? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

दरम्यान, पळून गेलेला गुंड पवन दिवेकरला पुंडलिकनगर ठाण्याचे उपनिरीक्षक अर्जुन राऊत यांच्या पैठणगेट येथून बेड्या ठोकल्या. त्याला पकडताना राऊत हे जखमी झाले असून त्यांना पायाला गंभीर मार लागला. पहिल्या फिर्यादीनुसार, नीलेश ऊर्फ सूर्या रांजणे याला पवन दिवेकर याने फोन करून बोलावून घेतले. हनुमान चौकात पवन आणि त्याचे साथीदार कुणाल साळवे, रोहन दिवेकर, सिद्धार्थ चाबुकस्वार, सतीश हिवराळे यांनी येथे फक्त आमचीच चालते अशी आरडाओरड करत नीलेशला बेदम मारहाण केली. यावेळी पवन दिवेकर याने आपल्या कमरेची बंदूक काढून हवेत एक गोळी झाडली आणि दुसरी गोळी नीलेशच्या दिशेने फायर करत त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. दुसऱ्या बाजूने कुणाल साळवे याने दिलेल्या फिर्यादीनुसार, हनुमान चौकात वाद सुरू असताना निलेश रांजणे आणि त्याच्या साथीदारांनी हल्ला केला नीलेशने कुणालच्या पाठीवर चाकूने सपासप वार केले. यावेळी निलेश रांजणे आणि पवन दिवेकर या दोघांनीही आपापल्या बंदुका काढून एकमेकांवर रोखल्या होत्या, त्याचदरम्यान गोळीबार झाला. या जीवघेण्या थरारामुळे आजूबाजूचे दुकानदार आणि नागरिक जीव वाचवून पळत सुटले. साळवे आणि रांजणे दोघांच्या तक्रारीवरून परस्पर विरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दोन्ही गैंगविरुद्ध पुंडलिकनगर पोलिस स्वतः एक गुन्हा दाखल करणार आहेत.

## केशरबाई भावले यांचे दुःखद निधन

अंबड । प्रतिनिधी



अंबड तालुक्यातील साष्टपिंपळगाव येथील केशरबाई हरिभाऊ भावले यांचे दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता दुःखद निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी रात्री उशिरा साष्ट पिंपळगाव येथील हिंदू स्मशानभूमी मध्ये करण्यात आला केशरबाई भावले ह्या मागील तीन ते चार वर्षापासून आजारी होत्या आतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या दैनिक दुनियादारी चे पत्रकार सुरेश भावले व अँडव्होकेट सतीश भावले यांच्या त्या चुलती होत्या.त्यांच्या जाण्याने साष्ट पिंपळगवातील लोकांनी व पाहुणे मंडळींनी हळहळ व्यक्त केली.

## वाढदिवस साजरा करताना वाद; हाणामारीत एक गंभीर जखमी, स्कॉर्पिओ जाळली

पूर्णा । प्रतिनिधी

तालुक्यातील गौर गावात वाढदिवस साजरा करण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर तुंबळ हाणामारीत झाले. या घटनेत एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने हल्ला करून त्याला गंभीर जखमी करण्यात आले, तर संतप्त जमावाने एका स्कॉर्पिओ वाहनास आग लावल्याची घटना घडली. या प्रकारामुळे गावात तणावपूर्ण शांतता असून पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. १७) रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास गौर गावातील जुन्या बसस्थानक परिसरात काही युवकांनी रस्त्यावर दुचाकी आडवी उभी करून



वाढदिवस साजरा सुरू केला होता. त्याचवेळी एक पानपट्टी चालक तेथून जात असताना त्याने रस्ता मोकळा ठेवण्याबाबत सूचना केली. यावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद निर्माण झाला. गाडीला धक्का लागल्याने व आधीच्या वादाची पार्श्वभूमी असल्याने काही जणांनी संतापाच्या भरात धारदार 'कत्ती'ने हल्ला केला, ज्यात एक जण गंभीर जखमी झाला.

घटनेची माहिती गावात पसरताच मोठा जमाव घटनास्थळी जमला. संतप्त लोकांनी तेथे उभी असलेली स्कॉर्पिओ गाडी पेटवून दिली, ज्यात वाहन पूर्णतः जळून खाक झाले. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच चुडावा पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमी व्यक्तीला उपचारासाठी नांदेड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी सुशिल उर्फ काली केशव पारवे यांच्या तक्रारीवरून पाच जणांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी गावात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून गावाला सध्या पोलीस छावणीचे स्वरूप आले आहे.

## कशी सांगावी मैतरा परिश्रमाची ही कहाणी सारा विस्कटला गाव निळ्या नभाची करणी



पाथर्डी :यश प्राप्त करण्यासाठी शॉर्टकट नसतो तसं परिश्रम घेतल्याशिवाय आम्हा शेतकरी कष्टकरी यांना कष्टाची भाकरी मिळत नाही रखरखत्या उन्हात पाल ठोकून पाषाण फोडून दगडाला आकार देऊन स्वतःच्या भाकरीचे व फाटक्या तुटक्या संसाराला आकार देण्याचं काम करताना माया बाप जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी राजा आजही त्याच्या संघर्षशील जीवनाच्या वाटा शोधताना दिसत आहे.

## शॉर्टसर्किटमुळे ५ एकर मका जळून खाक ; शेतकरी कुटुंबावर आर्थिक आघात

किनवट । प्रतिनिधी

तालुक्यातील मलकजाम येथे शुक्रवारी (दि.१७) दुपारच्या सुमारास विद्युत तारांमधील शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत सुमारे ५ एकर क्षेत्रावरील मका पीक जळून खाक झाल्याची घटना घडली. कापणीस तयार असलेले पीक आगीत भस्मसात झाल्याने संबंधित शेतकरी कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. मलकजाम येथील सुमनबाई पोतन्ना अंगरवार व पोतन्ना नारायण अंगरवार यांच्या मालकीच्या सर्वे क्रमांक ३६२ मधील सुमारे २ हेक्टर क्षेत्रातील मका पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. चार



महिन्यांच्या परिश्रमानंतर उभे राहिलेले पीक कापणीच्या उंबरठ्यावर असतानाच आगीच्या विळख्यात सापडले.

स्थानिकांच्या माहितीनुसार, परिसरातील महावितरणच्या विद्युत तारा अनेक ठिकाणी सैल व झुकलेल्या अवस्थेत असून याबाबत वारंवार तक्रारी करण्यात आल्या होत्या. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर दुपारच्या वेळी तारांमध्ये शॉर्टसर्किट होऊन ठिणग्या पिकावर पडल्याने काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण केल्याचे सांगितले जात आहे. घटनेनंतर ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून संबंधित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याबरोबरच संभाव्य निष्काळजीपणाबाबत जबाबदारी निश्चित करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात बीड, ता.जि. बीड**

**किरकोल दियाणी अर्ज क्रमांक १०३/२०२०**

CNR No. MHBI0200003252026

**(मार्फत अॅड. बी. एन. तावरे)**

**मैना प्रभाकर जोगदंड वि. निरंक**

अर्जदार :- १. मैना भ्र. प्रभाकर जोगदंड, वय ७२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. देवीबामुळगांव, ता. जि. बीड,२. संतोष पि. प्रभाकर जोगदंड, वय-४७ वर्षे, धंदा नौकरी, रा. देवीबाभुळगांव ता. जि. बीड, ३. देवराज पि. प्रभाकर जोगदंड, वय-४० वर्षे, धंदा-नौकरी, रा. देवीबाभुळगांव ता. जि. बीड ह. मु. दिनालालसिंग चाळ, कुर्ला पाईपलाईन्स, सत्यानगर न्यु गणेश दीर साकीनाका, मुंबई -४०००७२

विरुध्द निरंक मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात प्रभाकर पि. नामदेव जोगदंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत प्रभाकर पि. नामदेव जोगदंड यांचा मृत्यु दिनांक ०९/०१/२०२६ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत प्रभाकर पि. नागदेव जोगदंड यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०९/०६/२०२६

आज दिनांक १६ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन,

**स्वाक्षरित** **लिपीक**

**स्वाक्षरित** **अधिक्षक**

सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे 'मुक्काम ठोको' आंदोलन

जालना । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये अतिवृष्टी, रोगराई आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक गहिनीनाथ कापसे यांच्या कार्यालयासमोर 'मुक्काम ठोको' आंदोलन सुरू केले आहे.

पंतप्रधान फसल बीमा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सुमारे २ लाख ६३ हजार शेतकऱ्यांनी विविध खरीप पिकांचा विमा उतरवला असून, यासाठी जवळपास ४० कोटी रुपयांचा हिस्सा शेतकऱ्यांनी भरला आहे. मात्र जून ते सप्टेंबरदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात




पिकांचे नुकसान होऊनही अनेक शेतकरी विमा लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या मते, नुकसान झाल्यानंतर सुमारे १५ दिवसांनी पाहणी केली गेली. त्यावेळी बहुतांश शेतकऱ्यांनी नष्ट झालेली पिके काढून टाकली होती, त्यामुळे प्रत्यक्ष नुकसानीचे अचूक चित्र समोर आले नाही. कापणी प्रयोगाच्या वेळी केवळ ५ ते १० टक्के पिके शिल्लक असल्याने अहवाल चुकीचा ठरल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे.

तसेच उपग्रह छायाचित्रांमध्ये पिके हिरवी दिसत असली तरी प्रत्यक्षात उत्पादन देणाऱ्या भागावर पाण्याचा गंभीर परिणाम झाला होता, असेही शेतकऱ्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे अशा छायाचित्रांच्या आधारे नुकसानाचे मूल्यमापन करणे चुकीचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, शासनाने नुकतीच जिल्ह्यासाठी केवळ ३ कोटी रुपयांची मदत जाहीर केली असून ती अत्यल्प असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे.

अतिवृष्टीमुळे झालेल्या वास्तविक नुकसानीनुसार विमा भरपाई द्यावी, तसेच प्रति हेक्टर १७ हजार रुपयांच्या भरपाईबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विमा कंपनी, कृषी विभाग आणि शेतकरी प्रतिनिधींची संयुक्त बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावावा आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

या आंदोलनात राजेंद्र शिंगारे, सुखदेव चंद, महादेव सावळे, बळीराम सवडे, बद्रीनाथ डोंगरे, बबलू गोरडे, नारायण गोरडे, गजानन सोळुंके, नारायण वाडेकर, सतीश वावळे, विजय कापरे, उद्धव लोंढे, सुनील खाडे, ज्ञानेश्वर राठोड यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
रविवार दि.१९ एप्रिल २०२६ | ६

# बालविवाह कराल तर गुन्हे दाखल होतील -जिल्हाधिकारी जॉन्सन

## अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर बालविवाहाविरुद्ध कडक मोहीम

बीड । प्रतिनिधी

अक्षय तृतीया हा शुभ मुहूर्त मानला जात असल्यामुळे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळ्यांचे आयोजन केले जाते . मात्र याच पार्श्वभूमीवर बालविवाहाचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून बीड जिल्ह्यात विशेष सतर्कता ठेवण्यात आली आहे . बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार मुलाचे वय २१ वर्षे आणि मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण नसताना होणारा विवाह हा गुन्हा मानला जातो आणि अशा प्रकरणात थेट गुन्हा दाखल केला जातो .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत . अक्षय तृतीयेनिमित्त गावागावात सामुदायिक व वैयक्तिक विवाहांचे आयोजन होत असताना प्रशासनाने ग्रामपातळीवर यंत्रणा सक्रिय केली आहे . ग्रामीण भागात ग्रामसेवक , तर शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी हे बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून कार्यरत असून ग्राम बाल संरक्षण समित्या सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एफ.एम.शेख यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की , गावात कोणताही विवाह ठरत असल्यास संबंधित मुलगा व मुलगी यांच्या वयाची खात्री करणे बंधनकारक आहे . विशेषतः अक्षय तृतीयेच्यादिवशी होणाऱ्या विवाहांवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी तालुका व ग्रामस्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली आहेत . मंदिर , मंगल कार्यालये आणि विवाहस्थळांवर प्रत्यक्ष पाहणी करून बालविवाह होणार नाही याची खात्री केली जाणार आहे .

बालविवाह रोखण्यासाठी केवळ प्रशासन नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याचेही अधोरेखित करण्यात आली आहे . नातेवाईक , धर्मगुरू , बँड पथक , केटरिंग सेवा , आचारी , छायाचित्रकार तसेच विवाहासाठी सेवा पुरवणाऱ्या सर्वांनी मुलगा – मुलीचे वय तपासल्याशिवाय सेवा देऊ नये , अन्यथा संबंधितांवरही कारवाई केली जाईल , असा इशारा देण्यात आला आहे. जिल्हा स्तरावर महसूल , पोलीस , शिक्षण आणि पंचायत राज यंत्रणांची समन्वय बैठक घेऊन स्पष्ट सूचना देण्यात आल्या



आहेत की , कोणत्याही परिस्थितीत बालविवाह होऊ देऊ नये . ग्रामपातळीवर दवंडी देणे , पोस्टर लावणे , विशेष ग्रामसभा घेणे , शाळांमध्ये पालक सभा आयोजित करणे तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे.

या संदर्भात बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की , बालविवाह ही समाजाच्या प्रगतीला अडथळा ठरणारी गंभीर समस्या आहे . अक्षय तृतीया सारख्या शुभ दिवशीही जर बालविवाह होत असतील , तर ते अत्यंत चिंताजनक आहे . प्रत्येक नागरिकाने सजग राहून अशा प्रकारांना थांबवणे आवश्यक आहे . कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास त्वरित चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ वर संपर्क साधावा . माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल .

बालविवाहाचे दुष्परिणाम केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित राहत नाहीत , तर संपूर्ण समाजावर त्याचा परिणाम होतो . लहान वयात विवाह झाल्यामुळे मुलींचे शिक्षण खंडित होते , आरोग्य धोक्यात येते आणि त्यांचे स्वावलंबन कमी होते . त्यामुळे ही समस्या सामाजिक , आरोग्य आणि आर्थिक अशा सर्व स्तरांवर ◀◀ पान ३ वर

# मिलिटरी भरती फसवणूक प्रकरण: वर्षभरापासून फरार आरोपीस अटक

वडवणी । प्रतिनिधी

मिलिटरीमध्ये नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १० लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीतील एका फरार आरोपीला वडवणी पोलिसांनी अटक केली आहे. पवन भिवा भोसले (रा. देवांग्रा, ता. भूम) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, तो गेल्या एका वर्षापासून पोलिसांना गुंगारा देत होता. तक्रार: १३ फेब्रुवारी २०२५ रोजी चिंचवन येथील सिताराम प्रभू बडे यांनी तक्रार दाखल केली होती. फसवणुकीची पद्धत: आरोपींनी फिर्यादीच्या भावास (अंगद बडे) मिलिटरीमध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले होते.



रक्कम: यासाठी फिर्यादीकडून रोख आणि ऑनलाईन स्वरूपात एकूण १० लाख रुपये घेण्यात आले. बनावट कागदपत्रे: आरोपींनी खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे खोटे नियुक्तीपत्र, बनावट सही आणि शिक्क्यासह दिले होते. चौकशीअंती हे पत्र बनावट असल्याचे समोर आले.

या प्रकरणातील दुसरा आरोपी दिवाकर नादी याला आधीच अटक करण्यात आली होती. मात्र, पवन भोसले फरार होता. १४ एप्रिल २०२६ रोजी तो गावी येणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच, वडवणी पोलिसांनी परांडा पोलिसांच्या मदतीने त्याला बेड्या ठोकल्या. न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सध्या सुशिक्षित बेरोजगारांची संख्या मोठी असल्याने, सरकारी नोकरीचे आमिष दाखवून कोणी पैशांची मागणी करत असेल तर तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सपोनि वर्षा व्हगाडे यांनी केले आहे.

# गेवराईत अवैध ‘मावा’ कारखान्यावर पोलिसांचा छापा ; सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील संजयनगर भागात राहत्या घरात सुरू असलेल्या अवैध मावा कारखान्यावर गेवराई पोलिसांनी शनिवारी (दि. १८ एप्रिल) धाड टाकली. या कारवाईत मानवी शरीरास अपायकारक असलेला सुगंधित तंबाखू, सुपारी आणि मावा तयार करण्याची मशिनरी असा एकूण २,१२,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अवैध गुटखा विक्रीवर कारवाई करण्याचे आदेश



पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिले होते. त्याअनुषंगाने गेवराई पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, संजयनगर येथील जावेद निजाम शेख (वय ३८) हा त्याच्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये प्रतिबंधित सुगंधित तंबाखूपासून मावा तयार करून त्याची विक्री करत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पथक तयार करून संबंधित ठिकाणी छापा टाकला.

जप्त केलेला मुद्देमाल व कारवाई:

झडती दरम्यान पोलिसांना त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखू, सुपारी, तयार मावा, मिक्सर आणि मावा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी मोठी लोखंडी मशीन आढळून आली. FSL पथकाच्या उपस्थितीत हा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी ◀◀ पान ३ वर

# ह.भ.प. महेबूब महाराज शास्त्री यांचे निधन

पाटोदा । प्रतिनिधी

सौताडा गावच्या अध्यात्मिक क्षेत्राला मोठा धक्का बसला असून वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. महेबूब महाराज शास्त्री यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे.



ह.भ.प. महेबूब महाराज शास्त्री यांनी आपल्या वेगळ्या आवाजाच्या शैलीत, विनोदी उदाहरणे व प्रभावी दाखले देत कीर्तनातून समाजप्रबोधनाचे कार्य आयुष्यभर केले. त्यांच्या सुमधुर व विचारप्रवर्तक कीर्तनांना संपूर्ण महाराष्ट्रभर मोठी पसंती मिळत असे. त्यांचे कीर्तन ऐकणे ही भाविकांसाठी एक पर्वणीच मानली जात होती. सौताडा येथे दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह, हरिपाठ, जागर, लक्ष्मण शक्ती सोहळा तसेच दिंडी सोहळ्यांमध्ये त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमांना विशेष आकर्षण प्राप्त होत असे. त्यांच्या उपस्थितीमुळे या धार्मिक सोहळ्यांना चार चांद लागत असत. गेल्या आठ दिवसांपासून त्यांच्यावर जामखेड येथे उपचार सुरू होते. मात्र प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नगर येथे नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून आणि नातवंडे असा परिवार आहे. ह.भ.प. महेबूब महाराज शास्त्री यांच्या निधनाने वारकरी संप्रदायाने एक अभ्यासू, प्रभावी व लोकाभिमुख कीर्तनकार गमावला असून सौताडा गावाने आपला अध्यात्मिक मार्गदर्शक हरपला आहे. त्यांच्या आठवणी आणि कार्य कायम स्मरणात राहतील.



# माजलगाव मठातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री संस्थान मठात श्री सद्गुरू मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहात झाले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त व भरघोस प्रतिसाद लाभला.

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी (चैत्र अमावस्या) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने युवक, नागरिक ◀◀ पान ३ वर

# प्राथमिक आरोग्य केंद्र दासखेड ‘आओ जाओ घर तुम्हारा’ ?

## वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नागरिकांमध्ये नाराजी

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील दासखेड हे प्रगतशील गाव म्हणून ओळखले जात असले, तरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कारभारावर सध्या प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, केंद्रात नियुक्त वैद्यकीय अधिकारी नियमितपणे हजर राहत नसल्यामुळे आरोग्य सेवा विस्कळीत होत आहे.





मागील दोन वर्षांपासून सुरू असलेल्या या प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. मात्र, प्रत्यक्षात फक्त एकच अधिकारी ड्युटी बजावत असल्याचे दिसून येत आहे. दोन दिवस तू, दोन दिवस मी अशा पद्धतीने ड्युटीची अदलाबदल केली जात असल्याची चर्चा गावात रंगली आहे. या प्रकारामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी निर्माण होत ◀◀ पान ३ वर

# केज येथील ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा उघडकीस
## स्थानिक गुन्हे शाखेकडून दोन दिवसात आरोपी जेरबंद

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडी माळी येथून चोरीला गेलेला ट्रॅक्टर आणि ट्रॉली शोधण्यात स्थानिक गुन्हे शाखेला (ड्उइ) अवघ्या दोन दिवसात यश आले आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून ५ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक १५ एप्रिल २०२६ रोजी सतिष सुदाम बनसोडे (रा. कानडी माळी, ता. केज) यांचा ट्रॅक्टर आणि ट्रॉली त्यांच्या



घरासमोरून अज्ञात चोरट्याने पळवून नेली होती. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं २१२/२०२६) दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना, पथकाने घटनास्थळापासून तब्बल ४० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांना आरोपीची माहिती मिळाली. आरोपी रामदास आसाराम श्रीराम (वय २५, रा. पायतळवाडी, ता. माजलगाव) हा त्याच्या घरी आल्याची खात्रीशीर बातमी मिळताच ◀◀ पान ३ वर

# दौलावडगाव येथे कराळेवस्ती नदीवरील नव्या पुलाचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते लोकार्पण उत्साहात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव येथील कराळेवस्तीवर जाणारा नदीवरील पूल अतिवृष्टीमुळे पूर्णपणे वाहून गेल्यानंतर गावकऱ्यांसमोर मोठा वाहतूक प्रश्न निर्माण झाला होता. शाळकरी मुले, शेतकरी तसेच दैनंदिन कामासाठी ये–जा करणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेत आष्टी मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश धस यांनी पुढाकार घेत प्रशासनाच्या माध्यमातून या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले.



अवघ्या सहा महिन्यांच्या कालावधीत काम पूर्ण करून त्यांच्या शुभहस्ते या नव्या पुलाचे लोकार्पण करण्यात आले.

जिल्हा वार्षिक नियोजन २०२५–२६ अंतर्गत ग्रामीण रस्ते व विकास या लेखा शिर्षाखाली सुमारे ४० लाख रुपयांच्या निधीतून हा पूल उभारण्यात आला आहे. मजबूत आणि दर्जेदार बांधकामामुळे हा पूल दीर्घकाळ टिकणारा असून परिसरातील नागरिकांसाठी सुरक्षित व सुलभ वाहतुकीचा मार्ग उपलब्ध झाला आहे. या पुलामुळे दौलावडगाव व कराळेवस्ती यांच्यातील संपर्क पुन्हा सुरळीत झाला असून शेतीमालाची वाहतूक, विद्यार्थ्यांची ये–जा तसेच ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनाला मोठा दिलासा मिळाला आहे.

अतिवृष्टीमुळे पूल वाहून गेल्यानंतर काही काळ गावकऱ्यांना पर्यायी मार्गांचा आधार घ्यावा लागत होता, ज्यामुळे वेळ व खर्च दोन्ही वाढत होते. मात्र लोकप्रतिनिधींच्या तत्परतेमुळे ◀◀ पान ३ वर

# शिक्षणाचा शतकभराचा झेंडा – अमोलक मंडळाचा राज्यभर गाजलेला दबदबा!

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील कडा येथील श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने शिक्षण क्षेत्रात उभारलेला शतकभराचा भक्कम वारसा अखेर राज्य पातळीवर दणदणीतपणे अधोरेखित झाला आहे. सरपंच परिषद, मुंबई यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा ‘शताब्दी दीपस्तंभ’ पुरस्कार जाहीर होताच, या संस्थेच्या कार्याची दखल केवळ औपचारिक राहिली नसून ती राज्यभरातील शैक्षणिक क्षेत्राला एक ठोस संदेश देणारी ठरली आहे.

शंभर वर्षांची परंपरा कामगिरी मात्र आजही आघाडीवर!

शतकभर केवळ टिकून राहणे हीच मोठी गोष्ट नाही, तर काळानुसार स्वतःला सिद्ध करत हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणे हीच खरी ताकद आहे. ग्रामीण भागात शिक्षणाची ज्योत तेवत ठेवत, गुणवत्तेचा उच्चांक गाठणाऱ्या या संस्थेने ‘काम करा आणि दाखवा’ हा मंत्र जपला आहे. त्यामुळेच हा सन्मान केवळ पुरस्कार नसून, एक दणदणीत मान्यता ठरली आहे.

अधिकृत शिक्कामोर्तब

सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्त काकडे यांनी अधिकृत पत्राद्वारे पुरस्कार जाहीर करत संस्थेच्या



कार्यावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यांच्या या घोषणेमुळे शिक्षण क्षेत्रातील या संस्थेची ‘अभेद्य ओळख’ अधिक ठळक झाली आहे.

पुण्यात रंगणार भव्य सोहळा

हा सन्मान सोहळा दि. ३० एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता यशदा पुणे येथे पार पडणार आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान होणार असून, कार्यक्रमाला राज्यातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

राजकीय व सामाजिक दिग्गजांची उपस्थिती

या सोहळ्यास ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आदर्श गाव संकल्पनेचे शिल्पकार पोपटराव पवार यांची उपस्थिती कार्यक्रमाला अधिकच वजनदार बनवणार आहे. पुरस्कार जाहीर होताच संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि अमोलक परिवारावर अभिनंदनाचा अक्षरशः महापूर उसळला आहे. आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी ही कामगिरी ठरत आहे.

शिक्षणाच्या नावाखाली केवळ दिखावा करणाऱ्या संस्थांसाठी हा सन्मान एक आरसा ठरणार आहे. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाने मात्र शंभर वर्षे केवळ इमारती नव्हे, तर माणसं घडवली – आणि त्याचाच हा बुलंद सन्मान!

हा पुरस्कार म्हणजे फक्त गौरव नाही तर शतकभराच्या घाम, जिद्द आणि समाजनिष्ठेचा गर्जणारा स्वीकार आहे!



# अत्याधुनिक पद्धतीचा वापर करून तयार केले चार चाकी वाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील ऑटोमोबाईल विभागात शिकणाऱ्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी पॉलिटेक्निक मधील उपलब्ध प्रयोगशाळा व वर्कशॉप यामध्ये अत्याधुनिक पद्धतीचा वापर करून चार चाकी वाहन तयार केले आहे.हे चार चाकी वाहन कमी खर्चिक, प्रदूषण मुक्त, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गास शेती कामासाठी मोठ्या प्रमाणात उपयुक्त ठरणारे वाहन चि.पार्थ वेदपाठक, सुयश महामुनी, रोहन जाधव,नीरज जोगदंड, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# खेडमध्ये अतिक्रमणांवर प्रशासनाचा बुलडोझर



खेड । प्रतिनिधी

खेड तालुक्यातील सरकारी आणि गायरान जमिनींवर बेकायदेशीर अतिक्रमण करून वैयक्तिक बेसुमार फायदा लाटणाऱ्या भूमाफियांवर महसूल प्रशासनाने हातोडा उगारला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. १२७/२०२२ च्या कडक आदेशानंतर, प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार प्रशांत बेडसे आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.


या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात व्यावसायिक अतिक्रमणधारकांना तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या सहीने निष्कासनाची (कारणे दाखवा) नोटिसा नुकत्याच बजावण्यात आल्या आहेत. येत्या २४ एप्रिलला तारखेला सुनावणी ठेवण्यात आली असून, पुरावे न दिल्यास या मिळकतीवर थेट बुलडोझर फिरवला जाणार आहे. या आक्रमक कारवाईमुळे तालुक्यातील भूमाफियांमध्ये दहशत पसरली आहे. खेड महसूल आणि ग्रामविकास विभागाने गोलेगाव, पिंपळगाव तर्फे चाकण आणि परिसरातील गायरान जमिनींची बारकाईने पाहणी केली. यात निवासी तसेच व्यावसायिक अतिक्रमणे उघडकीस आली. प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने हे सर्वेक्षण पूर्ण केले असून, कायदेशीर रणनीतीनुसार कारवाईचा रोडमॅप तयार केला आहे.

प्रशासनाने पहिल्या टप्प्यात फक्त व्यावसायिक गाळे, दुकाने आणि शेड्स यांना लक्ष्य केले आहे. कारण सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय आणि शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार, सार्वजनिक जमिनीवरील व्यावसायिक अतिक्रमणे कधीही नियमित करता येत नाहीत. निवासी अतिक्रमणांमध्ये काही अपवादात्मक तरतुदी असू शकतात, पण व्यावसायिक बांधकामांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. त्यामुळे प्रशासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, प्रथम व्यावसायिक अतिक्रमण जमीनदोस्त करावीत. या कारवाईत सुनावणीमध्ये अतिक्रमणधारक कायदेशीर परवानगीचे पुरावे सादर करू शकले नाहीत, तर थेट बुलडोझर कारवाई करण्यात येणार आहे. गेल्या ४ वर्ष (किंवा अधिक) काळातील दंडात्मक भाडे वसूल करण्यात येणार आहे.दंड न भरल्यास सातबारा उताऱ्यावर शासनाचा बोजा लादण्यात येणार आहे. याशिवाय संबंधितांवर थेट पोलिस तक्रार दाखल करण्यात येणार आहे. असे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी म्हटले आहे. ही कारवाई केवळ गाळे पाडण्यापुरती मर्यादित राहणार नाही. भूमाफियांना कायमचा धडा शिकवण्यासाठी प्रशासनाने पूर्ण कायदेशीर हत्यारे उपसली आहेत. प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी तयार केलेल्या 'क्शन प्लॅन'मुळे खेड तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना प्रशासनाने दाखवलेली आक्रमकता आणि पारदर्शकता यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे, तर अतिक्रमणधारकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशी कारवाई झाल्यास सरकारी जमिनी हडपणाऱ्यांना कोणतीही पळवाट राहणार नाही. २४ तारखेच्या सुनावणीनंतर अतिक्रमणविरोधी पथक आणि पोलिसांचा फौजफाटा कोणत्याही क्षणी जागेवर धडकू शकतो. ही 'सर्जिकल स्ट्राईक' खेड तालुक्यातील भ्रष्टाचार आणि अतिक्रमणांच्या विरुद्ध महसूल प्रशासनाची मजबूत इच्छाशक्तीचे प्रतीक असल्याचे स्पष्ट होत आहे.

# युरिया साठ्यात गोंधळ; पुण्यात १५ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित

पुणे । प्रतिनिधी

पॉस मशिन प्रणालीद्वारे प्रत्यक्षात युरियाची विक्री करूनही साठा अद्ययावत न करता तो जुनाच ठेवल्याने माहिती मिळण्यात तफावत दिसून आली. त्यामुळे अद्ययावत युरिया खतांचा साठा न केल्यामुळे पुणे जिल्ह्यातील १५ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.




त्यामुळे संबंधित विक्रेत्यांना निलंबन कालावधीत सर्व प्रकारच्या खत विक्रीस प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी निलंबित केलेल्या विक्रेत्यांकडून खते न घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

जिल्ह्यातील युरिया खतपुरवठ्यावर परिणाम होऊ नये म्हणून जिल्ह्यातील विक्रेत्यांची दिनांक १ एप्रिलपासून युरिया खताचा पॉस मशिनवरील साठा व प्रत्यक्षात विक्री केंद्रातील साठा, याची तपासणीची मोहीम कृषी विभागाने हाती घेतलेली आहे. या मोहिमेमध्ये सुमारे ३,५०० मेट्रिक टन युरिया खताचा साठा पॉस प्रणालीवर जो उपलब्ध नव्हता, तो कमी करण्यात आलेला आहे.

यामुळे खरीप हंगामात खताची वस्तुनिष्ठ उपलब्धता व पुरवठा नियोजन करण्यास जिल्हा कार्यालयास मदत होणार आहे. तसेच, निविष्ठा विक्रेत्यांना वेळोवेळी संधी देऊनही वेळेत कार्यवाही न केल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचेही त्यांनी कळविले आहे.

परवाने निलंबित झालेली तालुकानिहाय कृषी सेवा केंद्र

अदिती कृषी सेवा केंद्र-लिंगाळी, बळीराजा ग्रो एजन्सी-देऊळगाव राजे, शिवकृपा ग्रो एजन्सी-पिंपळगाव, नंदाई ग्रो सर्व्हिसेस-नंदादेवी, बिरोबा कृषी सेवा केंद्र-बिरोबा वाडी, श्रीराम कृषी भंडार-हिंगणी बेर्डे, श्रीनाथ ग्रो सर्व्हिसेस-राहू. इंदापूर : महेश फर्टिलायझर-आगोती नंबर १, गणेश ग्रो एजन्सी-कळस. शिरूर : विघ्नहर्ता कृषी सेवा केंद्र-मांडवगण फराटा. जुन्नर : विघ्नहर कृषी सेवा केंद्र-नारायणगाव, कृषी शक्ती ग्रो एजन्सी-जुन्नर. भोर : श्री भैरवनाथ शेती भांडार, वेळू. आंबेगाव : शेतकरीराजा कृषी उद्योग-गावडेवाडी

# शीतल तेजवानीला मोठा दिलासा ! मुंबई उच्च न्यायालयाने 'ती' अटक ठरवली बेकायदेशीर

पुणे । प्रतिनिधी

मुंढवा येथील चाळीस एकर सरकारी जमीन परस्पर अमेडिया कंपनीला विकताना कोट्यवधींचे मुद्रांक शुल्क चुकवून सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी मुख्य आरोपी शीतल तेजवानीला बावधन पोलिसांनी केलेली अटक आणि पुणे न्यायालयाने दिलेली पोलिस कोठडी मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली.



खडक पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात तेजवानी (डहशशींरश्र ढशक्षुरपळ) अटकेत असताना तिला पोलिसांसमोर हजर राहण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३५ (३) अंतर्गत नोटीस बजावण्याचा वरवरचा प्रयत्न करण्यात आला; तसेच अटकेची कारणे कळविली नसल्याने आरोपीच्या घटनात्मक हक्कांचे उल्लंघन झाल्याचा ठपका उच्च न्यायालयाने बावधन पोलिसांवर ठेवला. मुंढवा येथील भारतीय वनस्पती सर्वेक्षण विभागाच्या मालकीची चाळीस एकर जमीन परस्पर पार्थ पवारांची भागीदारी असलेल्या अमेडिया कंपनीला विकताना कोट्यवधी रुपयांचे मुद्रांक शुल्क चुकवून सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी कथित कुलमुखत्यार शीतल किसनचंद तेजवानी, कंपनीचा संचालक दिग्विजय पाटील आणि तत्कालीन सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांच्याविरोधात बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या संदर्भात खडक पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटकेत असलेल्या तेजवानीला बावधन पोलिसांनी न्यायालयाचे प्रॉडक्शन वॉरंट घेऊन १६ डिसेंबर २०२५ ला अटक केली. त्यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने तेजवानीला पोलिस कोठडी सुनावली होती.

या प्रकरणी तेजवानी आणि तारू यांच्याविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले असून, पुण्याच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाने तेजवानीचा जामीन फेटाळला होता. त्यानंतर तेजवानीने ड. अजय भिसे व ड. दीपाली केदार यांच्यामार्फत उच्च न्यायालयात 'रिट' याचिका दाखल करीत बावधन पोलिसांच्या कारवाईला आव्हान दिले होते. खडक पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात शीतल तेजवानी कोठडीत असताना, बावधन पोलिसांनी तिला ८ नोव्हेंबर २०२५ ला तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याची नोटीस देण्यात आली. त्यानंतर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम ३५ (३) अंतर्गत दुसरी नोटीस एक डिसेंबर २०२५ ला पाठवून तिला ६ डिसेंबर २०२५ ला तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यास सांगितले होते. त्याच्या आदल्या दिवशी बावधन पोलिसांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यासमोर तेजवानीला ताब्यात घेण्यासाठी अर्ज केला. त्यामुळे वैधानिक अटींचे पालन केल्याचा दिखावा करण्यासाठी नोटीस बजावण्याचे सोपस्कार करण्यात आले. याशिवाय तेजवानीचा ताबा घेताना आरोपीने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला तिच्या अटकेची कारणे कळविली नाहीत, असा युक्तिवाद तेजवानीचे वकील ड. अजय भिसे यांनी केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने तेजवानीची अटक आणि कोठडी बेकायदा ठरवित बावधन पोलिसांना झटका दिला.

# पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेच्या कोथरूड शाखेचा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन उत्साहात

पुणे । प्रतिनिधी

पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँक लि., पुणे यांच्या कोथरूड शाखेचा २५ वा (रौप्यमहोत्सवी) वर्धापन दिन समारंभ बुधवारी (दि. १५ एप्रिल २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भुसारी कॉलनी, पौड रोड येथील शिवसाई अपार्टमेंट येथे आयोजित या कार्यक्रमाला बँकेचे संस्थापक संचालक व विद्यमान अध्यक्ष कैलासराव (मामा) सखाराम कोद्रे यांच्यासह संचालक मंडळ सदस्यांची उपस्थिती लाभली.



वर्धापन दिनानिमित्त कोथरूड परिसरातील नागरिकांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ स्थानिक नागरिक, बँकेचे ग्राहक व सभासदांनी घेतला. तसेच महिलांसाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे महापालिकेतील स्वच्छता कर्मचारी, शिक्षिका, व्यावसायिक महिला तसेच महिला खातेदार यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून स्मिता सातपुते (सेवानिवृत्त मुख्याध्यापिका, शंकरराव मोरे विद्यालय) उपस्थित होत्या. त्यांनी बँकेस शुभेच्छा देत महिलांना मार्गदर्शन केले. यावेळी माजी नगरसेवक बंडू केमसे व स्थानिक मान्यवर चंद्रकांत शिंदे उपस्थित होते. बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या अध्यक्षा स्मिता शैलेश लडकत यांनी महिलांना बँकिंग व्यवहारांबाबत मार्गदर्शन केले. समारंभास अध्यक्ष कैलासराव सखाराम कोद्रे (मामा), उपाध्यक्ष साहेबराव विठ्ठलराव लोणकर, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्षा स्मिता शैलेश लडकत, संचालक कैलास (भाऊ) रामचंद्र कोद्रे, मंगल शिवाजीराव टिळेकर, शांताराम कोंडिराम चौधरी, नंदकिशोर तुकाराम विडकर, देवेंद्र सुरेश भाट, अ‍ॅड. अविनाश केरवा कवडे, अ‍ॅड. दिलीप महादेव जगताप, संदीप (दादा) कैलासराव कोद्रे, अनिल जगन्नाथ आवनावे, ज्ञानेश्वर रामभाऊ मोझे, किशोर फत्तू संघेलिया, संतोष मधुकर पेठे, अमित अजित गिरमे, सल्लागार जीवन दत्तात्रय म्हेत्रे, तसेच बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य के. सी. मिश्रा, अविनाश साहेबराव बनमाले, बी. व्ही. मोहंती, सेवक प्रतिनिधी वाळू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण जवळकर, महाव्यवस्थापक अस्लम तांबोळी, शाखा व्यवस्थापक तेजश्री पुरंदरे व सेवक वर्ग, दैनंदिन ठेव प्रतिनिधी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी साहेबराव लोणकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. अल्पोहाराने समारंभाची सांगता करण्यात आली.

# मी सक्षम उमेदवार, विधानपरिषदेवर मला संधी मिळावी, रुपाली ठोंबरेचं सुनेत्रा पवारांना पत्र

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्र लिहलं आहे. रुपाली ठोंबरे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून विधान परिषदेवर संधी देण्याची विनंती केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणाऱ्या एकमेव विधान परिषद जागेसाठी रुपाली ठोंबरे यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पत्र लिहलं आहे. रुपाली ठोंबरे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांना पत्र लिहून विधान परिषदेवर संधी देण्याची विनंती केली आहे. मागील २० वर्षापासून राजकारणात सक्रिय असून विधान परिषदेच्या जागेवर संधी मिळावी अशी सुनेत्रा पवार यांना विनंती केली आहे. माजी नगरसेविका, शहर सुधारणा समिती अध्यक्ष म्हणून अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. पदवीधर निवडणूक लढवताना जनतेचा मोठा प्रतिसाद मिळाला असल्याचे रुपाली ठोंबरे यांनी सांगितले. जनतेच्या मुद्यावर ठाम आणि आक्रम भूमिका घेत आहे.अन्यायाविरोधात मी नेहमीच ठामपणे उभी राहिली आहे. समाजातील दुर्बल घटकांचा आवाजन बनण्याचे काम मी केल्याचा उल्ले रुपाली ठोंबरे यांनी पत्रात केला आहे. विधान परिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल. तर १२ मे रोजीच निकाल जाहीर होणार आहे. महाविकास आघाडीच्या वाट्याला एक जागा येणार असून ही जागा कोणत्या पक्षाला मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मोठं वक्तव्य केलं आहे.

# बार्टीच्या फेलोशिप विलंबावर आयोगाचा चाबूक; ३० दिवसांत उत्तर देण्याचे आदेश

पुणे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी २०२३ च्या पीएचडी संशोधकांसाठीची फेलोशिप जाहिरात अद्याप प्रसिद्ध न केल्यामुळे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. आयोगाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३३८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करीत बार्टीच्या महासंचालकांना नोटीस बजावली असून, ३० दिवसांच्या आत सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

सारथी आणि महाज्योती यांसारख्या इतर स्वायत्त संस्थांनी २०२३ च्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर केली आहे. मात्र, बार्टीने ३० ऑक्टोबर २०२३ च्या 'समान निकष' धोरणाचा चुकीचा आधार घेत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना या लाभापासून वंचित ठेवले आहे. हा संविधानातील कलम १४ (समानतेचा अधिकार) चा उघड भंग असून, यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रार आयोगाकडे करण्यात आली होती.वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संशोधक विद्यार्थी ऋषिकेश अशोक कांबळे यांच्या पुढाकाराने ही याचिका आयोगासमोर दाखल केली होती. आयोगाचे संचालक डॉ. जी. सुनीलकुमार बाबू यांनी स्वाक्षरी केलेल्या पत्रात स्पष्ट म्हटले आहे की, जर ३० दिवसांच्या आत समाधानकारक उत्तर मिळाले नाही, तर आयोग संविधानाने दिलेल्या दिवाणी न्यायालयाच्या अधिकारांचा वापर करून महासंचालकांना वैयक्तिकरीत्या समन्स बजावून हजर राहण्याचे आदेश देईल.

# नारायणगाव बाह्यवळणावर ट्रकची धडक; ७ मेंढ्या ठार, शेतकऱ्याचे मोठे नुकसान

नारायणगाव: पुणे-नाशिक महामार्गावरील बाह्यवळण रस्त्यावर ट्रकच्या धडकेत सात मेंढ्या व काही कोकरे ठार झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या अपघातात दोन शेळ्या गंभीर जखमी झाल्या असून मेंढपाळ तुकाराम निंबारकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, निंबारकर यांची शेती बाह्यवळण रस्त्याच्या पश्चिम बाजूस असून सध्या त्यांच्या शेतात कांदा काढणीचे काम सुरू आहे. कांदा काढणीनंतर उरलेल्या कांद्याच्या पातीवर चरण्यासाठी ते दुपारी मेंढ्या व शेळ्या घेऊन शेतात गेले होते. सायंकाळी साडेसात ते पावणेआठच्या सुमारास परतत असताना भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याने मेंढ्या व शेळ्या घाबरून रस्त्याकडे पळाल्या. दरम्यान, आळेफाटा बाजूकडून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक चालकाला अंधारामुळे कळपाचा अंदाज आला नाही आणि ट्रकची जोरदार धडक बसली. या धडकेत सात मेंढ्या व काही कोकरे जागीच ठार झाली, यामुळे तुकाराम निंबाळकर यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. पोलिसांनी ट्रक चालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी या शेतकऱ्याची आहे.

एवढे मोठे नुकसान झाल्यामुळे तुकाराम निंबारकर यांना मानसिक धक्का बसला आहे. या रस्त्यावर असलेले पथदिवे बंद असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या बाह्यवळण रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याबाबत आठ दिवसांपूर्वीच बाजार समितीचे माजी संचालक विपुल फुलसुंदर यांनी दुरुस्तीची मागणी केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने हा अपघात घडल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली आहे. वेळीच पथदिवे सुरू केले असते तर ही दुर्घटना टळली असती, अशी भावना निंबारकर यांनी व्यक्त केली असून प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# सहकार क्षेत्राला नवी चालना; विद्यापीठांत 'सहकार विभाग' सुरू करणार: मंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळ कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमात मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. सहकार क्षेत्राची ताकद वाढवण्यासाठी आणि कुशल नेतृत्व घडवण्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये स्वतंत्र सहकार विभाग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले. तसेच, राज्य सहकारी संघासाठी प्रशिक्षण निधी पुन्हा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव आगामी पावसाळी अधिवेशनात मांडला जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळ कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रवीण दरेकर, सुनील कांबळे, दीपक तावरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पाटील म्हणाले की, सहकाराची पायाभरणी मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण अत्यावश्यक आहे. त्यामुळे सहकारी संस्थांकडून शुल्क आकारून प्रशिक्षण निधी उपलब्ध करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. तसेच, राज्य सहकारी संघाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक निधी देण्याचा निर्णयही अधिवेशनात घेतला जाईल. राज्यात स्वतंत्र सहकार विद्यापीठ स्थापन करण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, प्रवीण दरेकर यांनी सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी बंद पडलेला शिक्षण निधी तातडीने सुरू करण्याची मागणी केली. तसेच, सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींसाठी अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी राज्य सरकारने पाच कोटी रुपयांचा निधी द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

सहकार क्षेत्राला नवी चालना; विद्यापीठांत 'सहकार विभाग' सुरू करणार: मंत्री चंद्रकांत पाटील यांची घोषणा

या कार्यक्रमात सहकार क्षेत्रात नीतिमूल्यांची जपणूक आणि सक्षम नेतृत्वाची गरज अधोरेखित करण्यात आली. शालेय स्तरापासून सहकार संस्कृती रुजवण्यासाठी पाठ्यपुस्तकांमध्ये 'सहकाराची प्रार्थना' समाविष्ट करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला.

# कॅनलमध्ये बुडालेल्या श्रीशचा १० दिवसांनंतरही पत्ता नाही; हतबल वडिलांची प्रशासनाविरुद्ध 'एकाकी' झुंज

पुणे । प्रतिनिधी

नऱ्हे परिसरातील १४ वर्षीय श्रीश धेंडे बेपत्ता होऊन दहा दिवस उलटले, तरीही त्याचा ठावठिकाणा लागलेला नाही. कॅनॉलमध्ये बुडाल्याचा संशय असून प्रशासनाची टोलवाटोलवी, शोधकार्यातील ढिलाईच्या पार्श्वभूमिवर एका वडिलांची एकाकी झुंज या प्रकरणाला गंभीर बनवत आहेत. श्रीश हा ६ एप्रिल रोजी मित्रांसोबत मूर्ती विसर्जनासाठी गेला असताना अचानक बेपत्ता झाला. तपासात सीसीटीव्ही फुटेजमध्ये त्याच्यासोबतची काही मुले श्रीशचे कपडे, मोबाइल घेऊन पळताना दिसत आहेत.

सुरुवातीला या मुलांकडून परस्परविरोधी माहिती मिळाली. नंतर एका मुलाने श्रीश कॅनॉलमधील पाण्यात बुडाल्याचे सांगितले. तथापि, या दिशेने शोधकार्य अपेक्षित वेगाने झाले नसल्याचे दिसते. अग्निशमन दलाने कॅनॉलमधील पाण्याचा वेग जास्त असल्याचे कारण देत मोहिम प्रभावीपणे राबवली नाही. जलसंपदा विभागाने पाणी कमी करण्यास नकार दिल्याने शोधकार्य ठप्प झाले. याबाबत श्रीशचे वडील प्रदीप धेंडे यांनी सरकारी यंत्रणा निष्क्रिय बसल्या आहेत का? असा संतप्त सवाल करत त्यांनी स्वतःच्या खर्चाने जेसीबी यंत्र लावून कॅनॉल परिसरात शोधकार्य सुरू केले.

खडकवासला कालवा.

पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवूनही ठोस मदत न मिळाल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, नांदेड सिटी पोलिसांनी खडकवासला विभागाशी पाण्याचा विसर्ग कमी करण्याबाबत पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. पाणी कमी झाल्यानंतर शोधमोहीम प्रभावीपणे राबवली जाईल, असे त्यांचे मत याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस म्हणाले की, कॅनॉलमध्ये पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असून झाडा-झुडपांचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे सध्या शोधकार्य करणे धोकादायक आहे. अनेकदा गळ टाकून पाहिले, मात्र कचराच अडकत आहे. श्रीशसोबत असलेल्या मुलांची चौकशी करण्यात आली असून त्यांनी भीतीपोटी सुरुवातीला माहिती लपवली होती. आता त्यांनी श्रीश बुडाल्याची कबुली दिली आहे. दरम्यान, श्रीशच्या आईशी पोलिसांनी संपर्क साधून कोणावर संशय असल्यास पोलीस ठाण्यात येऊन माहिती देण्याचे आवाहन केले आहे. मात्र, त्या पोलिसांत येण्यास तयार नसल्याने त्यांच्याशी व्हिडिओ कॉल संवाद साधण्याचा प्रयत्न सुरू आहे. दहा दिवस उलटूनही कोणताही ठोस पुरावा किंवा निष्कर्ष समोर न आल्याने या प्रकरणात प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. एका निष्पाप मुलाच्या शोधासाठी कुटुंबीयांनाच स्वतः झगडावे लागत असल्याची ही घटना प्रशासनाच्या अपयशाकडे बोट दाखवते.